मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

उपसंपादक - श्री विलास गायकवाड • कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे • निवासी संपादक - श्री राकेश पाटील • सह संपादक - श्री मुकुंद कांबळे • महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३ | अंक : ३१८ | शुक्रवार, ३१ जुलै २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ४ | RNI MAHMAR/2023/89514




# 'ड्रग्ज फ्री मुंबई' अभियानाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून कौतुक

## पंतप्रधान मोदींच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात 'ड्रग्स फ्री मोहीम' अधिक सक्षम - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ड्रग्सच्या माध्यमातून भारताच्या तरुण पिढीला कमकुवत करण्याचे शत्रूंचे षडयंत्र - कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्र शासनाच्या 'ड्रग्स फ्री मुंबई' अभियानाचे कौतुक करत, हे अभियान युवकांना जागरूक, सक्षम आणि नशामुक्त समाज घडविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हटले आहे. नशामुक्त भारताच्या संकल्पपूर्तीसाठी जनजागृती, कुटुंब, समाज आणि विविध संस्थांच्या सामूहिक सहभागाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. युवकांची ऊर्जा आणि सकारात्मक विचार हे विकसित भारताचे बळ असल्याचे नमूद करत त्यांनी या 'ड्रग्स फ्री मुंबई' अभियानाच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या आशयाचे पत्र 'ड्रग्स फ्री मुंबई' अभियान कार्यक्रमादरम्यान वाचून दाखविण्यात आले.

वरळी येथील एनएससीआय डोम येथे गुरुवारी सकाळी ११.३० वाजता 'ड्रग्स फ्री मुंबई' अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, कोकण विभागीय आयुक्त रूबल अग्रवाल, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'नशामुक्त भारत'चा संकल्प केला आहे. तो पूर्ण करण्यासाठी मुंबईसह महाराष्ट्र अमली पदार्थमुक्त करणे आवश्यक आहे. भारत हा युवकांचा देश असून, देशाला आतून कमकुवत करण्यासाठी ड्रग्सचा वापर केला जात आहे. त्यामुळे ड्रग्सच्या संपूर्ण इकोसिस्टिमविरोधात सर्वांनी सामूहिक लढा उभारण्याची गरज आहे. आपल्या परिसरात अमली पदार्थांची विक्री किंवा संबंधित बेकायदेशीर हालचाली आढळल्यास त्याची माहिती पोलिसांना द्यावी. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाईल आणि उपयुक्त माहिती देणाऱ्याला पुरस्कारही दिला जाईल.

नशामुक्ती जनजागृती अभियानाच्या उच्चस्तरीय समितीच्या अध्यक्षपदी कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी ते म्हणाले की, 'ड्रग्स फ्री मुंबई' अभियान सुरू करणे ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. भारताचे शत्रू तरुण पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यात ओढण्याचे षड्यंत्र रचत आहेत. त्यामुळे देशासाठी या नशेच्या संकटाविरुद्ध युवकांनी जागरूक राहून एकत्रितपणे लढा उभारणे आवश्यक आहे. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात अमली पदार्थांविरोधातील कारवाई मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलेल्या भूमिकेनुसार युवकांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी तळागाळापर्यंत जनजागृती पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे मंगल प्रभात लोढा म्हणाले की, केवळ सरकार किंवा पोलीस यंत्रणेवर सर्व जबाबदारी सोपवून चालणार नाही. समाजातील प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक आणि सामाजिक संस्थांनी या अभियानात आपले योगदान देणे आवश्यक आहे. 'ड्रग्स फ्री मुंबई' हे केवळ सरकारी अभियान नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. या अभियानाबाबत सर्व समाजघटकांनी सक्रिय सहभाग घेण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली होती. त्यांनी ती सकारात्मकरीत्या मान्य केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

देशविघातक शक्तींचा प्रयत्न असेच चालू राहतील आणि युवांना ड्रग्सच्या आहारी नेण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे पालकांची जागरूकता आणि मुलांशी सातत्यपूर्ण संवाद अत्यंत महत्त्वाचा आहे. 'ड्रग्स फ्री मुंबई' हे एक दिवसाचे अभियान नसून मुंबई पूर्णपणे अमली पदार्थमुक्त होईपर्यंत हा जनआंदोलनाचा प्रवास सुरू राहणार आहे. युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध योजना सुरू केल्या आहेत. त्यांनी योग्य मार्ग निवडावा, योग्य कौशल्य आत्मसात करावे आणि स्वतःसाठी व आपल्या कुटुंबासाठी उज्वल भविष्य घडवावे हीच आमची इच्छा आहे. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून आम्ही अभ्यासासह तरुणांना विविध प्रकारचे कौशल्ये सुद्धा देत आहोत. राज्यभर हजारो कौशल्य विकास केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. हीच कौशल्ये विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवतील. रोजगारक्षम युवांना उद्योजक बनवण्याचा सुद्धा आमचा प्रयत्न आहे त्यासाठीच १५ ऑगस्टपासून 'सीएम महाफंड' योजना सुरू करण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात एक लाख विद्यार्थी-विद्यार्थिनींना आर्थिक मदत देण्याचे उद्दिष्ट आहे, असेही मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

यावेळी मंगल प्रभात लोढा यांनी सर्व नागरिकांना आवाहन करताना, "ड्रग्समुक्त मुंबईचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येकाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा आणि समाजहितासाठी एकत्रितपणे पुढे यावे," असे सांगितले.

राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये नशामुक्ती जनजागृतीसाठी समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. या समित्यांच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या ट्रेनिंग मॅन्युअलचे यावेळी अनावरण करण्यात आले.

या अभियानांतर्गत वर्षभर विविध स्तरांवर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या निमित्ताने मुंबईतील शाळा, महाविद्यालये, समुपदेशक, पालक आणि विविध सामाजिक संस्थांना एकत्र आणून अमली पदार्थांविरोधात व्यापक जनजागृती केली जाणार आहे. 'अमली पदार्थांना नकार द्या, जीवनाला होकार द्या' हा संदेश समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविणे आणि युवकांना निरोगी, जबाबदार जीवनशैलीकडे प्रेरित करणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### जेन-झी पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांसोबत

आम्ही कोणत्याही प्रकारची नशा करणार नाही आणि नशेपासून कायम दूर राहू, अशी शपथ झेन-जीनी घेतली. तसेच, नशामुक्त मुंबई आणि नशामुक्त भारत घडविण्यासाठी आम्ही शासन व पोलीस यंत्रणेला सर्वोतोपरी सहकार्य करू, असा विश्वास त्यांनी कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना व्यक्त केला. माननीय प्रधानमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी केलेल्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत या कार्यक्रमात हजर असलेल्या १० हजार जेन झी युवांनी ड्रग्स सेवनाच्या विरोधात शपथ घेतली तसेच ऑनलाईन माध्यमातून ५ लाख पेक्षा जास्त विद्यार्थांनी शपथ घेतली.


# दि.बा.ची वारी दिल्ली च्या दरबारी,नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव द्या

**रमेश अमर राऊत कल्याण ग्रामीण प्रतिनिधी :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी ५ ऑगस्ट रोजी नवी मुंबईसह रायगड, ठाणे, पालघर आणि महाराष्ट्रातील हजारो दि.बा.पाटील प्रेमी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणार आहेत. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या मागणीला न्याय मिळावा, यासाठी विविध सामाजिक संघटना, प्रकल्पग्रस्त आणि दि. बा. पाटील प्रेमी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार आहेत.

**स्वर्गीय दि. बा. पाटील कोण होते?**

स्वर्गीय दीनकर बाळू (दि. बा.) पाटील हे रायगड आणि नवी मुंबई परिसरातील शेतकरी, प्रकल्पग्रस्त आणि भूमिपुत्रांचे बुलंद नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात शेतकरी, कष्टकरी, मच्छीमार आणि सामान्य जनतेच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष केला.

सिडकोसह विविध विकास प्रकल्पांमुळे जमिनी गमावलेल्या शेतकऱ्यांना न्याय, योग्य मोबदला, पुनर्वसन आणि रोजगार मिळावा यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या लढ्यामुळे हजारो प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली गेली.



दि. बा. पाटील यांनी कोणत्याही पदाचा मोह न बाळगता समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यांचे संपूर्ण आयुष्य हे भूमिपुत्रांच्या न्याय्य हक्कांसाठी समर्पित होते. त्यामुळे आजही त्यांना लाखो नागरिक आदराने स्मरतात.

**विमानतळाला नाव देण्याची मागणी का?**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी मोठ्या प्रमाणावर स्थानिक शेतकऱ्यांनी आपली जमीन दिली. त्यामुळे या विमानतळाला भूमिपुत्रांचे नेते स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, अशी स्थानिकांची अनेक वर्षांपासून मागणी आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी विविध स्तरांवर आंदोलने, मोर्चे आणि निवेदने देण्यात आली आहेत.

### ५ ऑगस्ट रोजी जंतर-मंतरवर निर्णायक आंदोलन

**५ ऑगस्टचे आंदोलन**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे,या मागणीला न्याय मिळावा म्हणून ५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे भव्य आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने भूमिपुत्र, शेतकरी, प्रकल्पग्रस्त आणि विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी होणार असून, केंद्र सरकारने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव जाहीर करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात येणार आहे.

"भूमिपुत्रांच्या त्यागाचा सन्मान म्हणून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे," अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

# प्रामाणिक प्रयत्न, सातत्य व दृढ आत्मविश्वास ही यशाची गुरुकिल्ली : अभिषेक गाडेकर

## राजमुद्रा फाऊंडेशनतर्फे धामणगाव शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फराळ भेट

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर :** प्रामाणिक प्रयत्न, सातत्य व दृढ आत्मविश्वास ही त्रिसुत्री यशाची गुरुकिल्ली असल्याचे मत राजमुद्रा सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष अभिषेक गाडेकर यांनी व्यक्त केले. फुलंब्री तालुक्यातील धामणगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, वृक्षारोपण व संगोपन साहित्य भेट कार्यक्रमात ते बोलत होते.

गेल्या १६ वर्षांपासून राजमुद्रा सामाजिक संस्था शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक, धार्मिक, पर्यावरण व क्रीडा आदी विविध क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. त्यानुषंगाने विधानपरिषद आमदार सुहास शिरसाठ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून धामणगाव येथील १७० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फराळ वाटप करण्यात आले. तसेच शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून गावकऱ्यांच्या सहभागातून झाडांच्या संगोपनासाठी संरक्षण जाळी भेट देण्यात आली.



यावेळी माजी पंचायत समिती सदस्य अभिषेक गाडेकर, सोमिनाथ हंडे, कलीम पटेल, भाऊसाहेब दाभाडे, सुनील कनसे, युनूस पटेल, राजू डिडोरे, प्रवीण डिडोरे, ताहेर पटेल, इब्राहिम पटेल, जावेद पटेल, कौतिक डवने, रावसाहेब डिडोरे , समद पटेल, प्रवीण हंडे, शालेय समिती अध्यक्ष कलीम पटेल, एकनाथ ढवळे, मुख्याध्यापक दत्तात्रय खाडे, त्रिभुवन सर, असलम सर, राजपूत मॅडम, झाल्टे सर, परदेशी मॅडम, काकडे मॅडम, शिंदे मॅडम, शेख मॅडम, दांडगे सर, डिडोरे सर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेकडे फिरविली पाठ?

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी/ खरीप हंगाम २०२६ -२७ मध्ये शेतकऱ्यांनी पेरणी पूर्ण केली मात्र नैसर्गिक संकट उभे ठाकले आणि विमा संरक्षण करण्यासाठी मोठी रक्कम मोजावी लागते पिकविमा तर मिळणे रामभरोसे त्यामुळे विम्यापेक्षा धोका परवडला पण भरपाईवरचा भरोसा गेला या वर्षी मात्र नैसर्गिक संकटापासून संरक्षण देणारे प्रधानमंत्री पीक विमा योजनेकडे शेतकऱ्यांनी चक्क पाठ फिरवली असल्याचे चित्र दिसत आहे ३१ जुलै अंतिम तारीख आज संपली असताना ही बरंच शेतकऱ्यांनी पीक विमा उतरवला नाही गेल्या वर्षीतील नुकसान भरपाई





बाबतचा कटु अनुभव दाव्यांवरील वाद आणेवारी पैसेवारी हे वाद यामुळे शेतकऱ्यांचा विमा कंपनी वरली विश्वास डळमळीत झाला अशी चर्चा ग्रामीण भागातील शेतकरी करत आहेत गेल्या वर्षी अतिवृष्टी झाली गारपीट झाली गोदावरी नदीला दोन वेळा पुर आले शेती चार चार दिवस पाण्याखाली गेली मात्र नुकसान भरपाई मिळाली नाही त्यामुळे विमा भरून ही उपयोग होत नाही अशी भावना अनेक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे यंदाही पावसाचे अनिश्चित वातावरण कायम असतानाही अनेक शेतकरी विमा करण्याऐवजी धोका पत्करण्यास तयार असल्याचे बोलले जात आहे

# लोकप्रिय आ. प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये "ऋतू हिरवा" अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जाणीव एक सामाजिक संस्था पनवेल यांच्या वतीने "ऋतू हिरवा" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पावसाळ्याच्या विविध छटांचा अनुभव देणारा हा अनोखा सांस्कृतिक कार्यक्रम मंगळवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे संपन्न होणार आहे.

"फक्त पाऊसगाणी नाहीत तर पावसाच्या विविध २२ रूपांचा अनुभव देणारा" असा हा कार्यक्रम असून, रसिक प्रेक्षकांसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे. या



कार्यक्रमाची संकल्पना आणि निवेदन अनघा मोडक यांनी केले आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये संगीत, कविता, नाट्य आणि विविध कलाविष्कारांच्या माध्यमातून पावसाच्या विविध पैलूंना उजाळा देण्यात येणार आहे. जाणीव एक सामाजिक संस्था संस्थापक-अध्यक्ष तथा महापौर नितीन जयराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पनवेलमधील नागरिकांनी आणि कला रसिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. मोफत प्रवेशिकासाठी महापौर नितीन जयराम पाटील जनसंपर्क कार्यालय- ९३२३२६६१६३, ८४५१८४२९१९, ९८२०६६६७६८, ९८१९६७६५१८, पनवेल भाजप मध्यवर्ती कार्यालय- ८०८०८२८१८२, अमोल स्टेशनरी, टिळक रोड - ९८२०२३३३४९ यांच्याशी संपर्क साधावा.

## १ सप्टेंबरपर्यंत ॲग्रीगेटर कंपन्यांनी नोंदणी करावी; अन्यथा कठोर कारवाई – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई :** राज्यातील ॲग्रीगेटर आधारित प्रवासी वाहतूक अधिक सुरक्षित, पारदर्शक व नियमबद्ध करण्यासाठी राज्य शासनाच्या ॲग्रीगेटर धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून, राज्यात कार्यरत सर्व ॲग्रीगेटर कंपन्यांनी १ सप्टेंबर २०२६ पर्यंत विहित प्रक्रियेनुसार परिवहन विभागाकडे नोंदणी पूर्ण करावी. त्यानंतर विनानोंदणी अथवा नियमबाह्य पद्धतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या ॲग्रीगेटर कंपन्या आणि संबंधित वाहनांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.राज्यात ॲपआधारित प्रवासी वाहतुकीचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला असून लाखो नागरिक या सेवेचा वापर करीत आहेत. त्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता, वाहनांची वैधता, चालकांची पात्रता तसेच ॲग्रीगेटर कंपन्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, ही शासनाची भूमिका आहे. मात्र सुविधेच्या नावाखाली कायद्याचे उल्लंघन करून प्रवाशांच्या सुरक्षिततेशी तडजोड करण्यास कोणालाही परवानगी दिली जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.राज्याच्या नवीन ॲग्रीगेटर धोरणानुसार संबंधित कंपन्यांनी परिवहन विभागाकडे नोंदणी करणे बंधनकारक राहणार आहे. ॲग्रीगेटरशी संलग्न असलेल्या वाहनांकडे वैध परवाना, वैध वाहन नोंदणी तसेच प्रवासी वाहतुकीसाठी आवश्यक व्यावसायिक नोंदणी असणे आवश्यक आहे. बाईक, रिक्षा किंवा कॅबचा व्यावसायिक प्रवासी वाहतुकीसाठी वापर करताना संबंधित वाहन वैध व्यावसायिक वाहन म्हणून नोंदणीकृत असणे आवश्यक राहील. तसेच वैध ॲग्रीगेटर परवान्याशिवाय खासगी अथवा अन्य वाहनांद्वारे व्यावसायिक प्रवासी वाहतूक करता येणार नाही.ॲग्रीगेटर पॉलिसी-२०२६ नुसार वाहनांसाठी आवश्यक विमा संरक्षण असणे बंधनकारक असून, प्रत्येक ॲग्रीगेटर कंपनीने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आवश्यक यंत्रणा कार्यान्वित करावी. तसेच नियमानुसार उपलब्ध करून द्यावयाच्या सेवांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत परिवहन विभागाला आवश्यक सूचना देण्यात आल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. प्रवासी हा या व्यवस्थेचा केंद्रबिंदू असून त्याला सुरक्षित, विश्वासार्ह आणि कायदेशीर सेवा मिळणे हा त्याचा हक्क आहे. ॲग्रीगेटर व्यवसायाला शासनाचा विरोध नसून हा व्यवसाय कायद्याच्या चौकटीत आणि निर्धारित नियमांनुसारच झाला पाहिजे. त्यामुळे सर्व ॲग्रीगेटर कंपन्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून १ सप्टेंबरपूर्वी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहनही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

# ऐरोलीमध्ये पालिकेची मोठी कारवाई
# १३ अनधिकृत बांधकामांवर पालिकेचा हातोडा

**दैनिक युवक आधार**
**अमोल कांबळे (ऐरोली प्रतिनिधी)** : सामाजिक कार्यकर्ते राजीव मोहन मिश्रा यांचेमार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांबाबत जनहित याचिका क्र. 80/2013 मध्ये अवमान याचिका क्रमांक 562/2022 दाखल करण्यात आली आहे. तसेच ॲड. किशोर शेट्टी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत जनहित याचिका क्रमांक 111/2022 व अवमान याचिका 685/2026 दाखल केली आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे आणि तुर्भे येथील अल्प उत्पन्न व मध्यम उत्पन्न (LIG / MIG) घरांमधील Violating of Floor Space Index आणि अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत सदर जनहित याचिका आहे.




ॲड. किशोर शेट्टी यांनी कोर्टात दाखल केलेल्या PIL अवमान याचिका CP/685 / 2025 मध्ये अनधिकृत विनापरवानगी इमारतींचे छायाचित्र सादर केले होते. सदरील छायाचित्रांमध्ये नमूद अनधिकृत इमरतींना जी विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 54 अन्वये नोटीसा बजाविण्यात आलेल्या होत्या. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. तरी मा. आयुक्त सो, नमुंमपा यांच्या जाहिर अवाहन दि. 27/07/2026 रोजीच्या आदेशान्वये मा. अतिरिक्त आयुक्त व मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांच्या मार्गदर्शनखाली व न.मु.म.पा च्या 8 विभागातील सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन १३ अनधिकृत बांधकामांवर पालिकेने कारवाई केली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत 1) मनोज कुमार झा, रो हाऊस क्रमांक 20, से-02, अभिलाषा सोसायटी, ऐरोली. 2) मोहम्मद मुबीन, C-552, से - 02, ऐरोली. 3) सुनिल नवरे, रो-हाऊस नं-10, से - 2बी, ऐरोली. 4) संतोष सुखदेव प्रसाद, घर क्र- 95/97, गल्ली क्र. 5, शिवकॉलनी, से -01, ऐरोली. 5) संजयकुमार दुबे, रो-हाऊस नं- 118, से - 2बी, ऐरोली. 6) संजय कुमार दुबे, रो-हाऊस नं- 119, से-2बी, ऐरोली. 7) संजय कुमार दुबे, रो-हाऊस नं-120, से-2बी, ऐरोली. 8) भिमराव पाटील, G-81, से - 03, ऐरोली. 9) मालमत्ताधारक, G-166, से- 03, ऐरोली. 10) विनीत विनय सिंह, रो-हाऊस नं10, प्रिती सोसायटी, से - 2C, ऐरोली. 11) वैभव सदानंद सावंत, रो-हाऊस नं 11, प्रिती सोसायटी, से - 2C, ऐरोली. 12) दिनानाथ धर्मराज यादव, रो-हाऊस नं 12, प्रिती सोसायटी, से-2C, ऐरोली. 13) अवदूत लक्ष्मण पवार, रो-हाऊस नं 13, प्रिती सोसायटी, से - 2C, ऐरोली येथे अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते. यावर आज पालिकेने धडक कारवाई केली आहे.

या धडक मोहिमेसाठी जी - विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी / कर्मचारी, जेसीबी -01, पोकलन-1, मजूर 36, ब्रेकर-11, घन-15, गॅस कटर - 03, जनरेटर - 9 तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तसेच स्थानिक पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## मुस्कान शेख मृत्यू प्रकरणाची धाराशिवच्या त्रिसदस्यीय समितीकडून चौकशी; आज बीडमध्ये जबाब नोंदविणार

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** बीड जिल्हा रुग्णालयातील माता व बाल रुग्णालयात उपचारादरम्यान झालेल्या मुस्कान शेख (वय वर्षे २४, रा.इस्लामपुरा, बीड) यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी आता धाराशिव येथील त्रिसदस्यीय समितीकडून करण्यात येणार आहे. स्थानिक चौकशी समितीवर नातेवाईकांनी निष्पक्षतेबाबत आक्षेप घेतल्यानंतर वरिष्ठ स्तरावर ही समिती नियुक्त करण्यात आली असून, आज शुक्रवार (दि. ३१ जुलै) रोजी सकाळी ११:०० वाजता बीड जिल्हा रुग्णालयातील व्हीसी हॉलमध्ये संबंधितांचे जबाब नोंदविले जाणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे. मुस्कान शेख यांच्यावर १० जुलै रोजी नव्या माता व बाल रुग्णालयात सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली होती. शस्त्रक्रियेपूर्वी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सतीशकुमार सोळंके आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नागेश चव्हाण यांनी रुग्णाची भेट घेत संवाद साधला होता. मात्र शस्त्रक्रियेनंतर मुस्कान



शेख यांचा मृत्यू झाल्याने आरोग्य यंत्रणा आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या प्रकरणात वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कथित हलगर्जीपणामुळे वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याचा आरोप करत दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे. दरम्यान २० जुलै रोजी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नागेश चव्हाण यांच्या समवेत झालेल्या चर्चेदरम्यान नातेवाईकांनी स्थानिक चौकशी समितीतील सदस्यांवर आक्षेप नोंदवत ही समिती निष्पक्ष चौकशी करणार नसल्याचे म्हटले होते. या पार्श्वभूमीवर डॉ.गणेश ढवळे यांनी दिलेल्या निवेदनासह समाज माध्यमांवरील नातेवाईकांच्या प्रतिक्रियांचा विचार करून प्रकरणाची चौकशी वरिष्ठ स्तरावरून करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार धाराशिव जिल्हा रुग्णालयातील डॉ.इस्माईल मुल्ला (स्त्रीरोगतज्ज्ञ), डॉ.नानासाहेब गोस्वामी (शल्यचिकित्सक) आणि डॉ.प्रशांत रेवडकर (भिषक) यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाने कळविले आहे. या समितीसमोर जबाब नोंदविण्यासाठी स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, अधिपरिचारिका तसेच संबंधित ओटी व आयसीयू कर्मचाऱ्यांसह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांना ३१ जुलै रोजी सकाळी

**स्थानिक चौकशी समितीवर नातेवाईकांचा आक्षेप; वरिष्ठ स्तरावर स्वतंत्र समितीची नियुक्ती : डॉ.गणेश ढवळे**

११:०० वाजता व्हीसी हॉल, जिल्हा रुग्णालय, बीड येथे उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत आंदोलनाचा इशारा**

सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी या प्रकरणात दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करत, "केवळ चौकशी समित्यांचा फार्स नको, दोषींवर कठोर कारवाई करा," अशी भूमिका घेतली आहे. या मागणीसाठी शुक्रवार, दिनांक ३१ जुलै रोजी पालकमंत्री ना.सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात होणाऱ्या आढावा बैठकीवेळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

## सोशल मीडियावर गुन्हेगारीचे उदात्तीकरण महागात; नंदनवन पोलिसांची धडक कारवाई, आरोपीला अटक करून जेलमध्ये रवानगी

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : सोशल मीडियाच्या माध्यमातून गुन्हेगारीचे उदात्तीकरण करत समाजात दहशत निर्माण करणारे रील तयार करून प्रसारित करणाऱ्या एका तरुणावर नंदनवन पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्याला अटक केली. आरोपीविरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयीन प्रक्रियेनंतर त्याची जेलमध्ये रवानगी करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी अमीन पटेल (वय अंदाजे २४ वर्षे, रा. नंदनवन, नागपूर) याने सोशल मीडियावर एक आक्षेपार्ह रील प्रसारित केली होती. त्या रीलमध्ये "शहर की हवा को कंट्रोल करना है ना... हमारे जैसा बनना है ना छोटे... हजारों के बीच में भी सामान मारने का दम रख" अशा स्वरूपाचा मजकूर वापरून गुन्हेगारीचे समर्थन व दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.ही बाब निदर्शनास येताच नंदनवन पोलिसांनी तातडीने दखल घेत आरोपीचा शोध सुरू केला. अल्पावधीतच त्याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध संबंधित कायदेशीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेनंतर आरोपीची जेलमध्ये रवानगी करण्यात आली.ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सोशल मीडियाचा गैरवापर करून समाजात



भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा स्पष्ट संदेश नागपूर शहर पोलिसांनी या कारवाईतून दिला आहे.

यावेळी नागपूर शहर पोलीस झोन क्रमांक ४च्या उपायुक्त अस्मिता राव यांनी स्पष्ट निर्देश देत सांगितले की, "समाजात दहशत निर्माण करणाऱ्यांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. कायदा सर्वांसाठी समान असून सोशल मीडियावरून गुन्हेगारीचे समर्थन किंवा धमकीचे संदेश प्रसारित करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल."नंदनवन पोलिसांच्या या तात्काळ आणि धडक कारवाईचे नागरिकांकडून स्वागत होत असून, समाजाच्या सुरक्षिततेसाठी नागपूर शहर पोलीस दल कटिबद्ध असल्याचा ठाम संदेश पुन्हा एकदा या कारवाईतून देण्यात आला आहे.

## शिरपूर जैनमध्ये ठाणेदार योगिता भारद्वाज यांचा कडक इशारा; अवैध धंदे तात्काळ बंद करा, अन्यथा थेट कायदेशीर कारवाई!"

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे** : शिरपूर जैन पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच ठाणेदार योगिता भारद्वाज यांनी आपल्या धडाकेबाज आणि शिस्तप्रिय कार्यशैलीची जोरदार छाप उमटविण्यास सुरुवात केली आहे. अवैध धंद्यांवर वचक, वाहतूक नियमांची काटेकोर अंमलबजावणी, व्यसनमुक्ती अभियान आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांनी दि. २९ जुलै रोजी शिरपूर जैन पोलीस ठाण्यात पत्रकार परिषदेचे आयोजन केले. या परिषदेत त्यांनी कायदा व सुव्यवस्थेबाबत स्पष्ट भूमिका मांडत अवैध धंदे करणाऱ्यांना थेट इशारा दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना ठाणेदार योगिता भारद्वाज म्हणाल्या की, शिरपूर जैन पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरू असतील तर ते



'शिरपूर जैन पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे, बेकायदेशीर कृत्य किंवा कायदा मोडणाऱ्या व्यक्तींना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. स्वतःहून अवैध धंदे तात्काळ बंद करा, अन्यथा कायद्यानुसार कठोर कारवाईस तयार राहा.'
— श्रीमती.योगिता भारद्वाज ठाणेदार शिरपूर जैन पोलीस स्टेशन

तात्काळ बंद करावेत. अन्यथा संबंधितांवर कोणतीही दया न दाखवता कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. त्यांच्या या सज्जड इशाऱ्यानंतर अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.यावेळी त्यांनी गावातील बेशिस्त पार्किंग, नंबर प्लेट नसलेली दुचाकी, ट्रिपल सीट प्रवास, कानाला मोबाईल लावून वाहन चालविणे, मद्यप्राशन करून वाहन चालविणे, रस्त्यावर हातगाड्या उभ्या करून वाहतुकीला अडथळा निर्माण करणे तसेच अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट केले.त्याचबरोबर व्यसनमुक्ती अभियान, महिला व मुलींची सुरक्षा, शाळा व महाविद्यालय परिसरातील १०० मीटर परिसर 'ड्रग्स फ्री एरिया' करण्यासाठी जनजागृती, तरुणांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी प्रबोधन, सायबर गुन्हे व मोबाईलच्या सुरक्षित वापराबाबत विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची

**पदभार स्वीकारताच धडक ॲक्शन; शिस्त, व्यसनमुक्ती आणि गुन्हेगारीविरोधी मोहिमेला वेग — पत्रकार परिषदेत स्पष्ट भूमिका**

माहिती त्यांनी दिली.

'एक कॅमेरा जनतेसाठी' या संकल्पनेअंतर्गत व्यापारी, डॉक्टर, शाळा व महाविद्यालयांनी आपल्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत व या मोहिमेला प्रसारमाध्यमांनी सहकार्य करून जनजागृती करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या पत्रकार परिषदेला विजय धोंगडे, कपिल भालेराव, गोपाल वाढे, शशिकांत देशमुख, कैलास भालेराव, उमेश बोराटे, किशोर जाधव, असलम खान पठाण, मुकुंद मस्के यांच्यासह परिसरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वरळी बीडीडी चाळ प्रश्नांवर सचिन अहिर यांच्यासोबत सकारात्मक बैठक

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभागीय संपादक** : मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी दुपारी विधानभवन येथे महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापती तथा आमदार ना. श्री. सचिनभाऊ अहिर यांची त्रिक्षेत्र विकास मंडळाचे पदाधिकारी व सदस्यांनी सदिच्छा भेट घेत विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी मंडळाच्या वतीने वरळी बीडीडी चाळ परिसर, डिलाईड रोड तसेच भोईवाडा परिसरातील बैठ्या घरांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या समस्या उपसभापतींसमोर मांडण्यात आल्या.बैठकीदरम्यान परिसरातील पुनर्विकास, रहिवाशांच्या मूलभूत सुविधा, घरांच्या अडचणी, विविध प्रशासकीय प्रलंबित बाबी तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या अडचणी तातडीने मार्गी लागाव्यात,





यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी मंडळाच्या प्रतिनिधींनी केली.

यावेळी उपसभापती ना. सचिनभाऊ अहिर यांनी मंडळाच्या प्रतिनिधींचे म्हणणे संयमाने ऐकून घेत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. तसेच पुढील आठवड्यात म्हाडाचे अधिकारी श्री. जयस्वाल यांच्यासोबत विशेष बैठक आयोजित करून संबंधित प्रश्नांवर चर्चा करण्यात येईल आणि शक्य तितक्या लवकर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यांच्या या भूमिकेमुळे उपस्थित पदाधिकारी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.या बैठकीस त्रिक्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. राज जाधव, खजिनदार श्री. संतोष मते, श्री. दिलीप जाधव तसेच मंडळाचे महिला व पुरुष पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी मंडळाच्या वतीने उपसभापती ना. सचिनभाऊ अहिर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या बैठकीमुळे वरळी बीडीडी चाळ, डिलाईड रोड आणि भोईवाडा परिसरातील बैठ्या घरांच्या प्रलंबित प्रश्नांना गती मिळण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली असून, शासन स्तरावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय होईल, अशी आशा परिसरातील रहिवाशांनी व्यक्त केली.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक: भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धी प्रिंटर्स, मंगल नगर, मलकापूर, पिन ४४३१०१, जि. बुलढाणा येथे छापून दैनिक प्रकाशित केले आहे. 'दैनिक युवक आधार' मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी, ग्रामपंचायत जवळ, मु.पो. आदई, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे.संपादक: भारती संतोष आमले.

Daily Yuvak Aadhar
Printed by Karansingh Prathadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, Mangal Nagar, Malkapur PIN 443101, Dist. Buldhana.Published at Head Office: Daily Yuvak Adhar, Indraprasth Society, Wing Flat No. 203-202, Survey No. 28/1/3, Panvel, Raigad, Adai Panvel Dist. Raigad.Editor: Bharti Santosh Amle.

# माध्यमांच्या दबावानंतर रायगड जिल्हा परिषदेला जाग; माहिती देण्यासाठी अखेर अधिकृत प्रवक्त्यांची नियुक्ती

## परिपत्रकावरून उठलेल्या वादानंतर प्रशासनाचे स्पष्टीकरण; पारदर्शकतेचा दावा, पण प्रश्न अद्याप कायम

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : गेल्या काही दिवसांपासून रायगड जिल्हा परिषद प्रशासनाच्या एका परिपत्रकावरून माध्यमे, पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रात तीव्र नाराजी व्यक्त होत असताना अखेर जिल्हा परिषदेला आपली भूमिका स्पष्ट करावी लागली आहे. माहितीच्या प्रवाहावर निर्बंध आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप होत असतानाच गुरुवारी (ता.३०) रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी माध्यमांसमोर येत जिल्हा परिषदेच्या वतीने अधिकृत माहिती देण्यासाठी पाच पदाधिकारी व अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा केली.गेल्या तीन-चार दिवसांपासून जिल्हा परिषद प्रशासनाने जारी केलेल्या परिपत्रकावरून मोठा वाद निर्माण झाला होता. या परिपत्रकामुळे पत्रकारांना थेट माहिती मिळण्यावर मर्यादा येतील, प्रशासनातील पारदर्शकता कमी होईल आणि माहितीचा अधिकार बाधित होईल, अशी टीका विविध स्तरांतून करण्यात आली होती. काही पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींनी या निर्णयावर उघडपणे प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.माध्यमांनी हा मुद्दा सातत्याने




लावून धरल्यानंतर अखेर जिल्हा परिषद प्रशासनाला स्पष्टीकरण द्यावे लागल्याची चर्चा आता जिल्हाभर रंगू लागली आहे.रायगड जिल्हा परिषद ही ग्रामीण विकासाची प्रमुख यंत्रणा असून शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, ग्रामपंचायत, कृषी, महिला व बालविकास तसेच विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. त्यामुळे या कामकाजाची माहिती जनतेपर्यंत पोहोचणे तितकेच आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर अधिकृत आणि अचूक माहिती एकाच माध्यमातून उपलब्ध व्हावी, यासाठी प्रवक्त्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. जिल्हा परिषदेत सध्या महायुतीची सत्ता असून शासनाच्या पारदर्शक कारभाराच्या भूमिकेनुसार माहितीचा प्रवाह अधिक सक्षम करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यातील संवाद अधिक परिणामकारक व्हावा, गैरसमज दूर व्हावेत आणि विकासकामांची माहिती वेगाने पोहोचावी, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

माध्यमांशी संवाद साधण्यासाठी रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, शिक्षण व अर्थ समिती सभापती चंद्रकांत कळंबे, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती वैकुंठ पाटील यांच्यासह जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) विशाल तनपुरे यांना अधिकृतपणे प्राधिकृत करण्यात आले आहे.

मात्र, या नियुक्तीमुळे निर्माण झालेला वाद पूर्णपणे संपेल का, हा प्रश्न अद्याप कायम आहे. कारण माध्यमांचा आक्षेप माहिती देण्यासाठी अधिकृत व्यक्ती नेमण्यावर नव्हता, तर प्रशासनातील इतर अधिकाऱ्यांशी संवाद साधण्यावर मर्यादा येतील का यावर होता. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासन प्रत्यक्षात किती पारदर्शकपणे व खुलेपणाने माहिती उपलब्ध करून देते, याची कसोटी आता आगामी काळात लागणार आहे.

दरम्यान, माध्यमांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांमुळेच प्रशासनाला खुलासा करावा लागला, अशी प्रतिक्रिया पत्रकार वर्तुळातून व्यक्त होत असून, लोकशाही व्यवस्थेत माध्यमांचा दबाव आणि जनतेचा माहितीचा अधिकार किती महत्त्वाचा आहे, हे या संपूर्ण प्रकरणातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# शेतकरी कर्जमाफी KYC मध्ये गोंधळच गोंधळ ! 'Farmer ID', 'No Record Found' च्या मेसेजमुळे शेतकरी मेटाकुटीला !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत बँक खात्यांची आणि कर्ज खात्यांची 'केवायसी' (KYC) प्रक्रिया सध्या सुरू आहे. मात्र, या डिजिटल प्रक्रियेतील तांत्रिक त्रुटींमुळे शेतकरी प्रचंड हैराण झाले आहेत. ऑनलाइन पोर्टलवर माहिती भरताना किंवा आधार प्रमाणीकरण करताना 'Farmer ID Missing', 'No Record Found' असे मेसेज येत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आले आहेत.

कर्जमाफीच्या पात्र लाभार्थ्यांची यादी पाहताना आणि सीएससी (CSC) सेतू केंद्रांवर KYC करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना खालील प्रमुख अडचणींना तोंड द्यावे लागत आहे:

अनेक शेतकऱ्यांच्या मूळ कर्ज खात्यावरील थकीत रक्कम आणि पोर्टलवर दिसणारी कर्जमाफीची रक्कम यात मोठी तफावत आढळत आहे. काही शेतकऱ्यांना प्रणालीमध्ये शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) दाखवला जात




नसल्याने पुढील KYC प्रक्रिया थांबत आहे. योजनेच्या सर्व अटी पूर्ण करूनही प्रणालीवर नाव शोधल्यास 'No Record Found' असा मेसेज येत असल्यामुळे पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे.त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील महा ऑनलाइन आणि सीएससी केंद्रांवर सर्व्हर डाऊन असल्यामुळे शेतकऱ्यांना तासनतास ताटकळत राहावे लागत आहे. यामुळे

शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष असून "बँकेचे फेऱ्या मारून आणि सीएससी केंद्रांवर चक्रा मारून आम्ही थकलो आहोत. एका बाजूला पिकांचे नुकसान आणि दुसऱ्या बाजूला कर्जमाफीच्या या तांत्रिक सावळागोंधळामुळे आमचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे," अशी उद्विग्न प्रतिक्रिया एका शेतकऱ्याने दिली.

शासनाने कर्जमाफीची प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी डिजिटल मार्ग निवडला असला, तरी ऐन मोसमात या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सरकारने बँका आणि सीएससी केंद्र चालकांना योग्य त्या सूचना द्याव्यात आणि एकही पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार नाही आणि शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात, अशी जोरदार मागणी विविध शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

कर्जमाफी योजनेअंतर्गत लाभ मिळताना जर एखाद्या शेतकऱ्याच्या योजनेतील बँक खात्याची किंवा कर्जाच्या रकमेची तफावत (रक्कमेचा फरक) आढळत असेल, तरीही प्रशासनाने सर्व संबंधित शेतकऱ्यांना आधी eKYC प्रक्रिया पूर्ण करून घेण्याचे आवाहन केले आहे.

eKYC पूर्ण केल्याने तुमचे लाभार्थी म्हणून असणारे खात्याचे पडताळणीचे काम पूर्ण होते. त्यामुळे रकमेत तफावत असली तरी तुमचे नाव योजनेच्या प्रक्रियेत सक्रिय राहते.

# गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत वांगी खुर्द येथे 'विजयपथ वाचनालय व अभ्यासिकेचे' दिमाखदार उद्घाटन!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : ज्ञानाचा प्रकाश पसरविणाऱ्या पवित्र गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून तालुक्यातील वांगी खुर्द ( ता. सिल्लोड )येथे 'विजयपथ वाचनालय व अभ्यासिकेचे' अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन संपन्न झाले. केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांच्या विशेष पुढाकारातून आणि स्वखर्चातून गावातील नवतरुणाईसाठी या दर्जेदार अभ्यासकेंद्राची उभारणी करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी पोषक वातावरण आणि अभ्यासासाठी एक हक्काचे व्यासपीठ मिळावे,



'गावातील मुलांनी उच्च शिक्षण घेऊन अधिकारी व्हावे, यासाठी विजयभाऊंनी दिलेली ही वाचनालयाची भेट खऱ्या अर्थाने ऐतिहासिक व मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दीपस्तंभ ठरेल.'

— लक्ष्मण पाटील मुरकुटे (शालेय समिती अध्यक्ष, वांगी खुर्द)

हा यामागचा मुख्य व दूरगामी उद्देश आहे. गुरुपौर्णिमेच्या पवित्र मुहूर्तावर या ज्ञानरूपी पर्वाचा शुभारंभ झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, तरुणांमध्ये प्रचंड चैतन्य पाहायला मिळत आहे.

या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी उपस्थितांनी विजय म्हस्के पाटील यांच्या या समाजोपयोगी उपक्रमाबद्दल मनःपूर्वक कौतुक केले. अशा विधायक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवणे अधिक सुकर होईल, असा ठाम विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या उद्घाटनाप्रसंगी गंगाधर जाधव, रमेश म्हस्के, मोबिनाभाई पठाण, अजिनाथ महाकाळ, लक्ष्मण दौड, योगेश म्हस्के, दत्तु महाकाळ, दादाराव भिसे, दाऊद पठाण , अजिनाथ म्हस्के, पवन मुरकुटे, कृष्णा मुरकुटे, अजिनाथ वीर, विलास म्हस्के, सुनील शेळके, नितेश म्हस्के, गौरव बोरसे, सागर महाकाळ आणि रोहित म्हस्के यांच्यासह बहुसंख्येने ग्रामस्थ व तरुण वर्ग उपस्थित होता.

# तळा ज्युनियर कॉलेजमध्ये नशामुक्त भारत अभियान व गुरुपौर्णिमा साजरी; एपीआय संतोष दराडे यांनी केले मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी** : तळा तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या आणि युवा पिढीच्या सुरक्षिततेसाठी तळा पोलीस ठाणे आता थेट मैदानात उतरले आहे. रायगड जिल्हा पोलिसांच्या अंतर्गत 'नशामुक्त भारत अभियान', 'जागतिक अमली पदार्थ विरोधी सप्ताह' आणि 'गुरुपौर्णिमेचे' औचित्य साधून कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात एका भव्य मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात तळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. संतोष दराडे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित भवितव्यासाठी एक धडाकेबाज ॲक्शन प्लॅन जाहीर केला.

सध्याच्या डिजिटल युगात आणि बदलत्या काळामध्ये तरुण पिढीला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे.




याच गोष्टीचा विचार करून एपीआय संतोष दराडे यांनी तळा तालुक्यातील विद्यार्थ्यांना अतिशय सोप्या भाषेत पण तितक्याच कडक शब्दांत मार्गदर्शन केले. त्यांनी प्रामुख्याने नशामुक्ती आणि व्यसनमुक्ती यावर भर देत, अमली पदार्थांच्या घातक विळख्यापासून सर्व तरुणांनी दूर राहण्याचा कडक सल्ला दिला. एवढेच नाही तर, वाढते सायबर क्राईम, पॉक्सो (POCSO) कायदा, विद्यार्थी सुरक्षा आणि महिला सुरक्षा या अत्यंत संवेदनशील विषयांवर त्यांनी कायदेविषयक सविस्तर माहिती दिली. "विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी तळा पोलीस ठाणे २४ तास तत्पर आहे," असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी उपस्थित शेकडो विद्यार्थ्यांना दिला.

या विशेष प्रसंगी व्यासपीठावर तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. मंगेश देशमुख, उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम मुळे आणि सचिव श्री. महेंद्रशेठ कजबजे प्रामुख्याने उपस्थित होते. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत या सर्व मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आयुष्यात गुरूंना असलेले अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना आणि गुरुजनांना मनापासून शुभेच्छा दिल्या.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सर्जे व्ही. बी. यांनी केले. या प्रसंगी कला- वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खांदेश्वर पोलिसांचे आवाहन : बेवारस मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे अकस्मात मृत्यू नोंद (ADR) क्र. 54/2026 भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 194 अन्वये दाखल करण्यात आली असून, एका अनोळखी बेवारस मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. 13 जुलै 2026 रोजी सायंकाळी नवीन पनवेल येथील आम्रपाली सोसायटीसमोरील फुटपाथ, प्लॉट क्र. 18, सेक्टर 13, आदई सर्कल येथे अंदाजे 40 ते 45 वर्षे वयोगटातील एक पुरुष बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने उपचारासाठी





उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला दाखलपूर्व मृत घोषित केले.

मृत व्यक्तीचे वर्णन असे आहे : वय अंदाजे 40 ते 45 वर्षे, अंगाने मध्यम, उभट चेहरा, बारीक काळे-पांढरे केस व दाढी, सरळ व मोठे नाक, काळे डोळे. अंगात पांढरा व नेव्ही ब्लू रंगाचा अर्ध्या बाह्यांचा 'BEING HUMAN' अक्षरे असलेला टी-शर्ट व स्काय ब्लू रंगाची जीन्स पॅन्ट परिधान केलेली होती.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे, खांदेश्वर पोलीस ठाणे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, सदर व्यक्तीबाबत कोणालाही माहिती असल्यास किंवा नातेवाईकांचा पत्ता माहीत असल्यास त्यांनी तात्काळ खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे संपर्क साधावा, जेणेकरून मृत व्यक्तीची ओळख पटविण्यास मदत होईल.

# 19 वर्षीय तरुणी बेपत्ता



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : 19 वर्षीय नाजमा अलीम खलिफा (राहणार आजीवली शाळेसमोर, आजीवली) ही तरुणी राहत्या घरातून कोणाला काहीही न सांगता निघून गेल्याने ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिचा रंग काळा सावळा, उंची चार फूट दोन इंच, नाक बसलेले आणि डाव्या नाकात नथ आहे. तिचा चेहरा गोलाकार असून अंगावरील कपडे पिवळया रंगाचे सलवार कमीज परिधान केलेले आहेत. तिला हिंदी आणि मराठी भाषा बोलता येते. या तरुणी बाबत अधिक माहिती असल्यास पोलीस उपनिरीक्षक गणेश मोकाशी यांच्याशी संपर्क साधावा.

# घरफोडीत लाखोंचे दागिने लंपास

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** कोनगाव येथील घरात घरफोडी करून चोरांनी लाखोंचे दागिने लंपास केले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 28 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. कोन गाव मराठी शाळेच्या मागे असलेल्या घराच्या दरवाजाचा कोयंडा तोडून चोरांनी आत मध्ये प्रवेश केला आणि दोन लाख 22 हजार पाचशे रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

# दुकानातील कपडे चोरले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : दुकानातील कपडे चोरून नेल्याप्रकरणी दोन अनोळखी महिलांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 29 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. रोशन गामोट यांचे कामोठे सेक्टर 34 या ठिकाणी क्युट लवली ब्युटीक सेंटरचे दुकान आहे. त्यांच्या स्टॉलवर लेडीज कपडे खरेदी करण्यासाठी दोन अनोळखी महिला आल्या होत्या. त्यातील एका महिलेने कपडे खरेदी करण्याचा बहाणा केला आणि कपडे दाखवण्यात गुंतवून दुसऱ्या महिलेने दहा हजार पाचशे रुपयांचे तीस टॉपने भरलेली पिशवी चोरून नेली.

# चाळीशीनंतर पेरिमेनोपॉजच्या तक्रारींमध्ये वाढ; हार्मोन थेरपीकडे महिलांचा वाढता कल – प्रसुती व स्त्रीरोगतज्ञ डॉ.सुरभी सिद्धार्थ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** चाळीशीनंतर महिलांमध्ये पेरिमेनोपॉजशी संबंधित तक्रारी वाढत असून, वेळेवर निदान आणि उपचारांसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणाऱ्या महिलांची संख्या वाढत असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले आहे. हार्मोनल आरोग्याबाबत वाढती जागरूकता आणि सोशल मीडियावरील माहितीमुळे अनेक महिला हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी या उपचारपद्धतीकडे वळत आहेत.

खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलच्या प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुरभी सिद्धार्थ यांनी सांगितले की, पेरिमेनोपॉज हा रजोनिवृत्तीपूर्वीचा संक्रमणकाळ असून या काळात इस्ट्रोजेन व प्रोजेस्टेरॉन हार्मोन्सचे



प्रमाण कमी होऊ लागते. त्यामुळे अनियमित मासिक पाळी, हॉट फ्लॅशेस, रात्री घाम येणे, झोपेचा त्रास, मूड स्विंग्स, थकवा, चिंता आणि योनीमार्गातील कोरडेपणा अशी लक्षणे दिसू शकतात. उपचारांकडे दुर्लक्ष केल्यास हाडांची झीज, हृदयविकाराचा धोका आणि मानसिक आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात.

त्यांच्या मते, योग्य महिलांमध्ये मुळे लक्षणांवर प्रभावी नियंत्रण मिळते, झोप आणि मानसिक आरोग्यात सुधारणा होते तसेच जीवनमान उंचावते. मात्र, उपचार प्रत्येक महिलेच्या वय, वैद्यकीय इतिहास आणि लक्षणांनुसारच ठरवले जातात. नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि ताणतणावाचे व्यवस्थापन यांचाही उपचारांमध्ये महत्त्वाचा वाटा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# राज्यात एकाही शेतकऱ्याची आत्महत्या होऊ देणार नाही; कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी अमरावती** : महायुती सरकारने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ची तळागाळापर्यंत प्रभावी अंमलबजावणी करून राज्यातील एकही पात्र शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहू नये, तसेच कर्जबाजारीपणामुळे राज्यात एकाही शेतकऱ्याची आत्महत्या होऊ नये, असे सक्त निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

मंत्रालयात सहकार व महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग बैठकीत ते बोलत होते. बैठकीला सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाधिकारी उपस्थित होते.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे. या योजनेत कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना (OTS) आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर अनुदान अशा तीन प्रमुख घटकांचा समावेश आहे. या माध्यमातून राज्यातील सुमारे ३२ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा, तर २४ लाख नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

योजनेच्या पहिल्या टप्प्यात सुमारे १६.९६ लाख कर्जखात्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी



प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकांची ७.०३ लाख आणि व्यापारी बँकांची ९.९३ लाख कर्जखाती समाविष्ट आहेत. उर्वरित पात्र शेतकऱ्यांची दुसरी यादी पुढील पंधरा दिवसांत प्रसिद्ध केली जाईल, असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला.

गावपातळीवर प्रसिद्ध झालेल्या याद्यांमध्ये काही व्यापारी बँकांच्या एनपीए खातेदारांच्या थकबाकीच्या रकमेत तफावत आढळल्याबाबत स्पष्टीकरण देताना प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी सांगितले की, ३१ मार्च २०२६ पर्यंत पोर्टलवर दर्शविण्यात आलेली थकबाकीची रक्कम ग्राह्य धरली जाईल. तसेच

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना सक्त निर्देश; १७ लाख कर्जखात्यांची पहिली यादी प्रसिद्ध, दुसरी यादी पंधरा दिवसांत

१ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज आकारले जाणार नसल्याबाबत सर्व बँकांनी शासनाला लेखी संमती दिली आहे.

योजनेनुसार शेतकऱ्यांनी प्रथम आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक राहील. प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर लाभाची पावती मिळेल आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम थेट डीबीटीद्वारे संबंधित कर्जखात्यात जमा केली जाईल. कर्जमुक्तीनंतर शेतकऱ्यांना कर्ज बेबाकी प्रमाणपत्र देण्यात येईल तसेच आगामी खरीप हंगामासाठी नवीन पीककर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कर्जमुक्त झालेल्या लाभार्थ्यांच्या याद्या बँक शाखा आणि विविध कार्यकारी सेवा संस्थांमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.

योजनेतील कोणत्याही तपशीलाबाबत शंका किंवा आक्षेप असल्यास शेतकऱ्यांना पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या तक्रारींचे निवारण जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत करण्यात येणार आहे.

बैठकीत बँकांसाठीही विशेष सवलतींची घोषणा करण्यात आली. एनपीए झालेल्या कर्जखात्यांच्या थकीत कालावधीनुसार बँकांना ३५ टक्क्यांपासून ८५ टक्क्यांपर्यंत तडजोडीची रक्कम मंजूर करण्यात येणार असून त्यामुळे कर्जमुक्ती प्रक्रियेला अधिक गती मिळणार असल्याचे महसूलमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# पॅरा गेम्स आणि आशियाई पॅरा गेम्ससाठी भारतीय पॅरा–खेळाडूंना मिळणार एसबीआय लाईफचे बळ

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई (प्रतिनिधी)** : भारतातील अग्रगण्य खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाईफ इन्शुरन्सने २०२६ च्या पॅरा स्पोर्ट्स सीझनसाठी भारतीय पथकाचे 'प्रिन्सिपल पार्टनर' म्हणून पॅरालिम्पिक समिती ऑफ इंडिया (पीसीआय) सोबतची भागीदारी अधिक दृढ करण्याची घोषणा केली आहे. या कराराअंतर्गत ग्लासगो येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ पॅरा गेम्स २०२६ तसेच जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई पॅरा गेम्स २०२६मध्ये सहभागी होणाऱ्या भारतीय पथकासाठी एसबीआय लाईफ 'ऑफिशियल लाईफ इन्शुरन्स पार्टनर' म्हणून कार्य करणार आहे.

पॅरिस २०२४ पॅरालिम्पिक स्पर्धेदरम्यान सुरू झालेल्या यशस्वी सहकार्याचा विस्तार करत एसबीआय लाईफने भारतातील पॅरा-खेळाडूंच्या जिद्द, मेहनत आणि उत्कृष्टतेच्या प्रवासाला पाठबळ देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या भागीदारीद्वारे देशातील पॅरा-खेळाडूंच्या यशोगाथा अधिक व्यापक स्तरावर पोहोचवण्याबरोबरच व्यक्तींना आत्मविश्वासाने आपल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी प्रेरित करण्याचा कंपनीचा उद्देश आहे.एसबीआय लाईफ इन्शुरन्सचे ब्रँड, कॉर्पोरेट कम्युनिकेशन आणि सीएसआर प्रमुख रविंद्र शर्मा म्हणाले, "आत्मविश्वास

PARALYMPIC COMMITTEE INDIA

व्यक्तींना आयुष्यातील अनिश्चिततेला सामोरे जाण्यास आणि स्वतःची स्वप्ने साकार करण्यास सक्षम करतो. 'अपने लिए, अपनों के लिए' या आमच्या ब्रँड तत्त्वज्ञानाशी सुसंगत अशी ही भागीदारी आहे. भारतीय पॅरा-खेळाडू जिद्द, पूर्वतयारी आणि चिकाटीचे सर्वोत्तम उदाहरण आहेत. त्यांच्या यशस्वी प्रवासाला पाठबळ देताना आम्हाला अभिमान वाटतो. ही भागीदारी केवळ क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टतेला नव्हे, तर व्यक्ती आणि कुटुंबांना भविष्यासाठी आत्मविश्वासाने तयार राहण्याच्या आमच्या वचनबद्धतेलाही अधोरेखित करते.

पॅरालिम्पिक समिती ऑफ इंडियाचे अध्यक्ष तसेच पद्मभूषण, पद्मश्री, मेजर ध्यानचंद खेलरत्न आणि अर्जुन पुरस्कार विजेते देवेंद्र झाझरिया यांनी सांगितले की, "२०२६ च्या पॅरा स्पोर्ट्स सीझनसाठी एसबीआय लाईफ भारतीय संघाचे प्रिन्सिपल पार्टनर म्हणून पुन्हा आमच्यासोबत जोडले जात असल्याचा आनंद आहे. पॅरिस २०२४ पॅरालिम्पिकमध्ये भारताने २९ पदकांची ऐतिहासिक कामगिरी केली होती आणि त्या प्रवासात एसबीआय लाईफ आमच्या पाठीशी होते. अशा कॉर्पोरेट भागीदारीमुळे पॅरा-खेळाडूंना केवळ त्यांच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करता येते. कॉमनवेल्थ आणि आशियाई पॅरा गेम्समध्ये भारताला आणखी मोठे यश मिळवून देण्यासाठी ही भागीदारी निश्चितच प्रेरणादायी ठरेल."कॉमनवेल्थ पॅरा गेम्स २०२६ आणि आशियाई पॅरा गेम्स २०२६साठी भारतीय पॅरा-खेळाडू तयारी करत असताना एसबीआय लाईफ त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणार आहे. आत्मविश्वास, पूर्वतयारी आणि सक्षम पाठबळाच्या बळावर प्रत्येक व्यक्ती असाधारण यश संपादन करू शकते, हा संदेश या भागीदारीतून अधोरेखित करण्यात आला आहे.

# बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त तीन नव्या पुस्तकांचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभागीय संपादक** : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त टिंपल पब्लिकेशनतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या तीन नव्या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा बुधवारी (२९ जुलै) यशवंतराव चव्हाण सेंटर, नरिमन पॉईंट, मुंबई येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. साहित्य, पत्रकारिता, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याला मोठ्या संख्येने शिवसैनिक, साहित्यप्रेमी आणि वाचकांनी उपस्थिती लावली.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे, युवासेना प्रमुख आमदार मा. आदित्य उद्धवसाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते आणि सौ. रश्मी उद्धवसाहेब ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा जपण्याचा हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

कार्यक्रमात 'मार्मिक प्रवासातील शतक', 'मर्मभेद' आणि 'ज्वलंत रेषा' या तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. ही पुस्तके बाळासाहेब ठाकरे यांच्या







विचारविश्वाचा, व्यंगचित्रकार म्हणून त्यांच्या असामान्य प्रवासाचा तसेच सामाजिक आणि राजकीय घडामोडींवरील त्यांच्या भूमिकेचा वेध घेणारी असल्याचे प्रकाशकांनी सांगितले. उपस्थित साहित्यप्रेमींनी या पुस्तकांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

या सोहळ्यास ज्येष्ठ संपादक व माननीय 'दै. नवशक्ती चे संपादक प्रकाश सावंत, 'दै. सुराज्य'चे संपादक राकेश टोळये , 'साप्ताहिक मार्मिक'चे संपादक मुकेश माचकर, ज्येष्ठ पत्रकार व संपादक विजय सामंत यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी प्रभावीपणे केले.

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतात बाळासाहेब ठाकरे यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे निर्भीड विचार, व्यंगचित्रांच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याची त्यांची शैली आणि मराठी अस्मितेसाठी दिलेले योगदान यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. नव्या पिढीने बाळासाहेबांचे विचार पुस्तकांच्या माध्यमातून जाणून घ्यावेत आणि समाजजीवनात त्यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

प्रकाशन सोहळ्यानंतर उपस्थितांनी पुस्तकांचे अवलोकन करत लेखक आणि प्रकाशकांचे अभिनंदन केले. सभागृहात बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यावर आधारित प्रदर्शन, पुस्तकांची आकर्षक मांडणी आणि व्यासपीठावरील भव्य सजावट यामुळे कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली. पुस्तक प्रकाशनानंतर अनेकांनी पुस्तके खरेदी करून लेखकांशी संवाद साधला. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा साहित्यिक उपक्रम त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणारा आणि मराठी साहित्यविश्वासाठी महत्त्वपूर्ण ठरणारा असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सांगता उपस्थितांच्या टाळ्यांच्या गजरात आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्याला अभिवादन करून करण्यात आली.




# गुरूंच्या चरणी कृतज्ञतेची पुष्पांजली अर्पण करत जासई विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली."

**दैनिक युवक आधार**

**उरण तालुका प्रतिनिधी / सागर घरत** : श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि बा पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई येथे गुरुपौर्णिमा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन आदरणीय श्री अरुण शेठ जगे साहेब, व्हाईस चेअरमन आदरणीय श्री ठाकूर डी आर साहेब, स्कूल कमिटी सदस्य आदरणीय श्री नरेश घरत साहेब आदरणीय श्री सल्लागार समिती सदस्य आदरणीय गणेश पाटील साहेब, विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री कुटे व्ही. के.,

पर्यवेक्षिका मुकादम मॅडम माजी शिक्षक श्री एन एच शेख सर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात व्यासमुनींच्या प्रतिमा पूजनाने झाली. वैष्णवी राजगे, नैतिक राठोड व समीक्षा जाधव या आठवी अ च्या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गुरुची महिमा वर्णन करताना गुरूविषयी कृतज्ञता व्यक्त केली. त्याचप्रमाणे प्रेमाची भेट म्हणून सर्व गुरुवर्यांना पुष्प पुष्पगुच्छ व लेखणी देण्यात आली. स्कूल कमिटीचे व्हाईस चेअरमन आदरणीय ठाकूर डी आर साहेब यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुचा महिमा वर्णन करताना सुंदर गीत गायन केले. विद्यार्थ्यांना गुरूविषयी सदैव मनामध्ये आदर व कृतज्ञता जपण्यास मार्गदर्शन




केले. गुरु शिष्य परंपरेचे महत्व विशद करताना ज्ञान , संस्कार आणि मूल्यांचे महत्व पटवून दिले . यावेळी विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. पाटील एन . पी. मॅडम यांनी विठ्ठल रखुमाईची अप्रतिम मूर्ती भेट म्हणून दिली. तसेच कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या नुरा शेख सरांनी गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आठवी अ च्या वर्गशिक्षिका सौ. वर्तक डी आर व आठवी अ ची विद्यार्थिनी सिद्धी निकम हिने केले. या कार्यक्रमांतर्गत इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती मध्ये शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या प्रथमेश मोरे व इयत्ता आठवी मध्ये अभय काळे इयत्ता सातवीतील उत्तीर्ण विद्यार्थीनी सिद्धी निकम तसेच बी टी एस मध्ये इयत्ता आठवी मध्ये उत्तीर्ण झालेल्या सान्वी घरत या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन इयत्ता आठवी अ आठवी ब या वर्गाने केले.

# गळयातील चेन हिसकावून चोर गेले पळून



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : दहा ग्राम वजनाची सोन्याची चैन गळयातून हिसकावून चोरटे पळून गेले. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत. 29 जुलै रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास बारवई पुलाजवळ पुणे मुंबई जुना हायवे येथे फिर्यादी उभे असताना मोटरसायकल वरून आलेल्या दोन इसमांनी त्यांच्या गळयातील चेन हिसकावून ते पळून गेले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509


# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चरण पादुका पालखी पुजन सोहळा !!

## भजन, मिरवणूक, किर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चरण पादुकांच्या पालखी पुजन सोहळयाचे आयोजन येत्या गुरुवार दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी अकोट येथे करण्यात आले आहे. समस्त मुंडगांवकर परिवार व श्री गुरुदेव भक्त परिवार अकोट यांच्या वतीने हा सोहळा श्री नरसिंग महाराज मंदिर सभागृहात साजरा होणार आहे.सकाळी ९ वाजता भजन सम्मेलनाने कार्यक्रमाला सुरुवात होईल. सकाळी १० वाजता केंद्रीय कार्यकारनी सचिव

श्री रवींद्रदादा मुंडगांवकर यांच्या निवासस्थानी चरण पादुकांचे आगमन व पुजन करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता चरण पादुकांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.सकाळी ११ वाजता श्री नरसिंग महाराज सभागृहात मुंडगांवकर परिवार व सर्व गुरुदेव भक्तांच्या उपस्थितीत पालखीचे सामुहिक पुजन होणार आहे. यावेळी पालखी सोबत आलेल्या गोपालदादा कडू, प्रचार प्रमुख व वारकरी मंडळींचा सत्कार सोहळा सकाळी ११ ते १.३० दरम्यान संपन्न होईल.कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणून सकाळी ११.३० ते १.३० या वेळेत ह.भ.प. लक्ष्मणदास काळे महाराज यांचे 'श्रीहरी किर्तन' होणार आहे. दुपारी १.३०



वाजता आरती, गोपाळकाला व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल. या कार्यक्रमासाठी प्रमोद मुंडगावकर,अनिल मुंडगावकर,सचिन भुस्कट शुकदास महाराज गाडेकर शिवाजी म्हैसने,दिनेश बोचे, पंकज मुंडगावकर या सर्वांची उपस्थिती राहणार असून या सोहळयाला आकोट व परिसरातील सर्व गुरुदेव भक्तांनी हजर राहण्याचे आव्हान तालुका प्रचारक राज सुदन कुलट यांनी केले आहे.

# श्रद्धा–भक्तीचा महासागर! गुरुपौर्णिमेला सावरबंध आश्रमात लाखो भाविकांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : श्रीक्षेत्र सावरबन दि.२९ गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त सावरबंध येथील श्री संत सद्गुरु मोतीराम बाबा आश्रमात लाखो भाविकांची मांदियाळी उसळली होती. राज्यातील विविध जिल्ह्यांसह परिसरातील हजारो गावांमधून आलेल्या भाविकांनी मोठ्या श्रद्धा-भक्तीने श्री संत सद्गुरु माऊली विदेही वसंत बाबा यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केले.




पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. "जय गुरुदेव"च्या अखंड जयघोषाने संपूर्ण आश्रम परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता. गुरुचरणी नतमस्तक होण्यासाठी आलेल्या भाविकांमध्ये अपार श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचे दर्शन घडत होते.

गुरुपौर्णिमेनिमित्त आश्रमात भजन, कीर्तन, नामस्मरण, प्रवचन, सामूहिक प्रार्थना तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गोपाळ काल्याच्या कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात रंगून गेला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांना भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत गुरुपौर्णिमा सोहळा अधिकच अविस्मरणीय केला.

सायंकाळी श्री संत सद्गुरु माऊली विदेही वसंत बाबा यांच्या हस्ते सोहळ्याची सांगता करण्यात आली. त्यानंतर गावातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात आणि भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण सावरबंध गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले.

भाविकांच्या सोयीसुविधांसाठी आश्रम प्रशासन व स्वयंसेवकांनी उत्कृष्ट नियोजन केले होते. पिण्याचे स्वच्छ पाणी, वैद्यकीय सुविधा, वाहनतळ, सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियंत्रण तसेच महाप्रसादाची चोख व्यवस्था करण्यात आली होती. स्वयंसेवकांनी दिवसभर सेवाभावाने कार्य करत भाविकांना कोणताही त्रास होऊ नये याची विशेष काळजी घेतली.

यंदाचा गुरुपौर्णिमा महोत्सव श्रद्धा, भक्ती, सेवा आणि अध्यात्माचा संगम ठरला. लाखो भाविकांच्या उपस्थितीमुळे सावरबंध येथील श्री संत सद्गुरु मोतीराम बाबा आश्रम परिसर भक्तीच्या महासागराने भरून गेला असून हा सोहळा भाविकांच्या स्मरणात कायम राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**राज्यासह विविध जिल्ह्यांतून आलेल्या लाखो भाविकांनी श्री संत सद्गुरु माऊली विदेही वसंत बाबा यांचे घेतले दर्शन; गोपाळ काल्याचे कीर्तन, भव्य पालखी मिरवणूक व विविध धार्मिक कार्यक्रमांनी गुरुपौर्णिमा सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न**

# वारंवार वीजपुरवठा खंडित; तिवरंगसह चार गावांचा रास्ता रोकोचा इशारा

## महावितरण, तहसील कार्यालय व पोलिस ठाण्यात निवेदन; उद्या अधिकाऱ्यांसोबत बैठकीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव : यवतमाळ** : वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या तिवरंग, कोणदरी, पोहंडुल व दहिसावळी येथील ग्रामस्थांनी एकत्र येत महावितरण कार्यालय, तहसीलदार तसेच पोलिस ठाण्याचे ठाणेदार यांना रास्ता रोको आंदोलनाचा इशारा देणारे निवेदन सादर केले.

गेल्या अनेक दिवसांपासून वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतीची कामे, पाणीपुरवठा व दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले आहे. यामुळे संतप्त झालेल्या शेतकरी व ग्रामस्थांनी प्रशासनाने तातडीने समस्येचे निराकरण न केल्यास रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

दरम्यान, या समस्येवर तोडगा काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांसोबत महादेव मंदिर, पोहंडुल येथे दि. ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता




बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस चारही गावांतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

निवेदन देताना रवी पवार, अस्वजीत भगत, दिनेश रावते, अस्लम चव्हाण, बालुसिंग जाधव, अतुल राठोड, सुनील राठोड, निशांत जाधव, अलकेश चव्हाण यांच्यासह तिवरंग, कोणदरी, पोहंडुल व दहिसावळी येथील समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महावितरण कार्यालय, तहसील कार्यालय व पोलिस ठाण्यात वीज समस्येबाबत रास्ता रोको आंदोलनाचा इशारा देणारे निवेदन सादर करताना चारही गावांतील ग्रामस्थ.

# प्रकाशगड येथे कंत्राटी कामगारांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक बैठक

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग मुंबई/ नागपूर :** प्रकाशगड, मुंबई येथे महावितरणचे अधिकारी, क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस व स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीच्या प्रतिनिधींसोबत तांत्रिक ॲप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस राज्य कार्याध्यक्ष विक्की कावळे व राज्य उपाध्यक्ष धिरज घायवट उपस्थित होते.



बैठकीत कंत्राटी कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक सबस्टेशनवर पुरेसे ऑपरेटर नियुक्त करून साप्ताहिक सुट्टी देणे, स्टेशनरी साहित्य व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करणे, सुरक्षा साहित्य (PPE) वाटप, दर महिन्याच्या ७ तारखेला वेतन अदा करणे, वेतनातील कपात, बोनस, रजा व थकीत एरिअर्स, पेमेंट स्लिप, PF व ESIC तसेच इतर विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली.

बैठकीत दोन सबस्टेशनसाठी एक रिलीव्हर ऑपरेटर नियुक्त करून सर्व ऑपरेटरांना साप्ताहिक सुट्टी देण्याचे आश्वासन देण्यात आले. उर्वरित सबस्टेशनवर आवश्यक सुविधा व सुरक्षा साहित्य लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे संबंधित कंपन्यांनी सांगितले.

वेतन वेळेत देण्यासाठी हजेरीपत्रक ३ तारखेपर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून विलंब करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

बोनस, थकीत एरिअर्स तसेच PF व ESIC संदर्भातील प्रलंबित बाबींची चौकशी करून लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. तसेच कामगारांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करण्यासाठी संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींचे संपर्क तपशील संघटनेला उपलब्ध करून देण्यात आले.बैठकीतील निर्णयांमुळे कंत्राटी कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीस गती मिळेल, असा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# इंदापूर तालुक्यात १२२६ शिधापत्रिकांवरील धान्य वितरण बंद

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : शासनाने निर्धारित केलेल्या पात्रता निकषांनुसार इंदापूर तालुक्यात १२२६ शिधापत्रिकांवरील स्वस्त धान्य वितरण बंद करण्यात आले आहे.या निर्णयामुळे ४८७४ लाभार्थी शिधापत्रिका योजनेच्या लाभातून वगळले गेले आहेत.इंदापूर तहसील कार्यालयाचे पुरवठा अधिकारी सपन गडमवार यांनी ही माहिती दिली.त्यांच्या म्हणण्यानुसार, आयकर विवरणपत्र (ITR) भरणारे,जीएसटी नोंदणीधारक तसेच कंपनीचे संचालक असलेल्या व्यक्ती शासनाच्या विद्यमान निकषांनुसार शिधापत्रिका योजनेस अपात्र ठरत असल्याने संबंधित शिधापत्रिकांवरील धान्य वितरण बंद करण्यात आले आहे.शासकीय




अन्नधान्याचा लाभ केवळ पात्र व गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचावा,या उद्देशाने लाभार्थ्यांची पडताळणी करण्यात आली.या प्रक्रियेत अपात्र लाभार्थ्यांची नोंद झाल्यानंतर त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.प्रशासनाने नागरिकांना आपल्या शिधापत्रिकेची माहिती आणि पात्रता वेळोवेळी तपासून आवश्यक असल्यास संबंधित पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अमली पदार्थ विरोधी पथकाची मोठी कारवाई ड्रग्स पुरवठा करणारी मुख्य महिला आरोपी जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेलच्या हद्दीत अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या तरुणांना एम.डी. ड्रग्सचा पुरवठा करणाऱ्या एका २४ वर्षीय तरुणीला अमली पदार्थ विरोधी पथकाने कामोठे येथून अटक केली आहे. प्राची नरेश बेकरे (२४) असे या तरुणीचे नाव असून, काही दिवसापूर्वी पोलिसांनी तस्करांना अटक केली होती. त्यांच्या चौकशीतून या तरुणीचे नाव पुढे आल्यानंतर पोलिसांनी तिला जेरबंद केले आहे.

खांदेश्वर पोलिसांनी आपल्या पॅराडाईज लॉजिंग अँड बोर्डीग या हद्दीतील आसूडगाव येथील गोल्डन लॉजवर गत ५ जुलै रोजी छापा मारला होता. या कारवाईत पोलिसांनी अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या लियाकत शोएब शेख, आकीब मोहम्मद सोहेल आणि राजा बिश्मा सरदार या तिघांना रंगेहात अटक केली होती. तसेच लॉजमधील रुम नंबर ३०४ आणि रुम नंबर ३०७ मधून तब्बल ५ लाख ३७हजार रुपयांचे ५.३७ ग्रॅम वजनाचे मेफेड्रान (एम.डी.) हे प्रतिबंधित अमली पदार्थ, डिजिटल वजन काटे, रोख रक्कम आणि मोबाईल हँडसेट असा मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल जप्त केला होता.

त्यानंतर पोलिसांनी तीन आरोपींची कसून चौकशी केली असता, सदर आरोपी लॉजवर राहून अमली पदार्थांची किरकोळ व घाऊक विक्री करत असल्याचे तसेच प्राची नरेश बेकरे ही तरुणी त्यांना हव्या त्या वेळेस थेट लॉजवर येऊन एम.डी. ड्रसचा पुरवठा करत असल्याचे तपासात आढळुन आले. अमली पदार्थ विरोधी पथकाने आणि खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणाचे धागेदोरे जुळवत सखोल तपास केला. त्यानंतर कामोठे येथे सापळा रचून प्राची नरेश बेकरे हिला तिच्या राहत्या घरातून ताब्यात घेतल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप निगडे यांनी दिली.

तरुणीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी खदिश्वर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आल्याचेही निगडे यांनी सांगितले.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, ओझर येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**ओझर प्रतिनिधी राकेश शर्मा** : पोदार इंटरनॅशनल स्कूल, ओझर येथे गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या डॉ. जसिंथा पार्के, स्कूल कोऑर्डिनेटर, मुख्याध्यापिका श्रावणी कामुझू तसेच प्रशासकीय विभागातील मान्यवर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर उपस्थित शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काव्या हांडगे व शिवांश रावत यांनी केले. विद्यार्थिनी सौम्या तसेच प्रज्वल आव्हाड, गायकवाड



आणि प्रल्हादमेश धागे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगणारी भाषणे केली व सुरेल गीत सादर केले. विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य आणि गुरु-शिष्य नात्यावर आधारित प्रभावी नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी प्राचार्या डॉ. जसिंथा पार्के यांनी विद्यार्थ्यांना शिक्षकांचा आदर, संस्कारांचे महत्त्व आणि जीवनात गुरुंचे स्थान याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचा समारोप काव्या हांडगे व शिवांश रावत यांनी आभार प्रदर्शन करून केला. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी प्राचार्या डॉ. जसिंथा पार्के यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला.

# सफाई कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर उपमहापौर संजय घाडी यांच्यासोबत बैठक

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस युनियनच्या वतीने मुंबई महापालिकेतील सफाई कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत उपमहापौर संजय घाडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीत सफाई कामगारांच्या सेवाविषयक, वारसहक्क, घरकुल, कंत्राटी भरती आदी महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी कंत्राटी पद्धतीने भरती न करता शासनाच्या जी.आर.नुसार नियमित भरती करावी, मोटार लोडर व केरकचरा विभागाचे



खासगीकरण रद्द करावे, तसेच ज्या विभागात कर्मचारी कार्यरत आहेत त्याच विभागात त्यांना काम देण्यात यावे, अशी मागणी युनियनने केली. नव्याने होणाऱ्या भरतीची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देणे, तसेच कोणतीही चौकशी न करता सेवेतून कमी करण्यात आलेल्या कामगारांना शासन निर्णयानुसार पुन्हा सेवेत घेण्याची मागणीही बैठकीत करण्यात आली. वारसहक्क नियुक्तीच्या प्रलंबित प्रकरणांबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता अर्ज डावलण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करत, शासनाच्या संबंधित जी.आर.नुसार तातडीने वारसहक्क नियुक्त्या देण्याची मागणी करण्यात आली. उपमहापौर संजय घाडी यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून धोरणात्मक स्वरूपाच्या प्रकरणांवर लवकर निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.बैठकीस अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष गोविंदभाई परमार, मुंबई अध्यक्ष रवी गवळी, उपाध्यक्ष नवीन मकवाना यांच्यासह युनियनचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासन प्रयत्नशील – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : नैसर्गीक अधिवास कायम राखत वैज्ञानिक दृष्टीकोणातून राज्यात व्याघ्र संवर्धनाची अंमलबजावणी सुरू आहे. हे कार्य पुढे घेवून जाण्यासाठी नवी पंचसुत्री आखण्यात आली आहे. तसेच मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे, प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या औचित्याने वन विभागाद्वारे येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेत (आयआयएम) आयोजित परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. वनमंत्री गणेश नाईक, शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) श्रीनीवास राव यांच्यासह कंबोडीया, भुतान आणि बांग्लादेशातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वाघ हा नैसर्गीक अधिवास आणि अन्न साखळीचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या संवर्धनातून पर्यावरणाचे व वनांचे संरक्षण होते. म्हणूनच राज्यात वैज्ञानिक दृष्टीकोणातून व्याघ्र संवर्धन कार्य सुरू आहे. राज्यातील 6 व्याघ्र प्रकल्पांच्या कोअर भागांतून गावांचे स्थलांतरण करण्यात आले व नवीन बफर क्षेत्र तयार करण्यात आले. वनविभागाच्या नवीन धोरणामुळे व्याघ्र प्रकल्पा शेजारील गावकऱ्यांनी पुनर्वसन व स्थलांतरासाठी पुढाकार घेतला आहे. मानव वन्यजीव संघर्ष दुर करण्यासाठी व्याघ्र प्रकल्पालगत गावांमध्ये नियोजनबद्ध कार्यपद्धती आखण्यात आली आहे. व्याघ्र हालचालीसाठी कॅमेरा ट्रॅकींग, एआय आधारित अर्ली वॉर्निंग सिस्टीम आदी उपाय योजना करण्यात आल्या आहेत. यामुळे




वाघ, जैवविविधता आणि पर्यटन यांच्या संवर्धनासाठी नवी परिसंस्था उभी राहिली आहे. परिणामी 2014 मध्ये राज्यात असलेली वाघांची 190 ही संख्या वाढून 444 झाली आहे व नवीन वाघ गणनेत ही संख्या 600 च्या वर गेल्याचे चित्र दिसेल, असे त्यांनी सांगितले.

जगातील व्याघ्र संख्येच्या 75 टक्के वाघ भारतात आहे आणि भारतातील वाघांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर आहे. गेल्या दोन दशकांपासून व्याघ्र संवर्धनासाठी उचलण्यात आलेल्या महत्वाच्या पाऊलांमुळे देशात वाघांच्या संख्येत महाराष्ट्र पहिल्या स्थानाकडे मार्गक्रमण करित आहे. वाघांच्या अस्तित्वाचे महत्व समजून घेत त्याचा मानवाच्या चरितार्थ व अस्तित्वासोबत समन्वय करून मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. मानव वन्यजीव संघर्ष कमी करणे, व्याघ्र अधिवास हरित उपजिविका अभियान राबविणे, व्याघ्र संवर्धनासाठी सीएसआर निधी उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर धोरण आखणे, शाश्वत पर्यटन धोरण तयार करून रोजगार निर्मिती करणे आणि पर्यटन वाढवतांना वनसंरक्षण व संवर्धनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे अशी व्याघ्र संवर्धनासाठी पंचसुत्री आखण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**राज्यात वृक्ष वाढविण्यासाठी 5 टिश्यु कल्चर प्रयोगशाळा- वनमंत्री गणेश नाईक**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात वनविभागाचा चेहरामोहरा बदलत आहे. या विभागाच्या विकासासाठी सर्वसहकार्य मिळत आहे. म्हणूनच व्याघ्र संवर्धनासोबतच नवनवीन संकल्पनांच्या अंमलबजावणीतून वनविभागाचे कार्य पुढे जात आहे. राज्यात 300 कोटी वृक्षारोपणाचा ध्यास विभागाने घेतला असून जास्तीत जास्त रोप तयार करण्यासाठी राज्यात 5 ठिकाणी टिश्यु कल्चर प्रयोगशाळा उभारण्यात आल्याचे, वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या औचित्याने वनविभागाद्वारे आयोजित याविशेष परिषदेच्या माध्यमातून राज्यातील व्याघ्र प्रकल्पांतून पर्यटनाला चालना व रोजगार निर्मिती होईल आणि येत्या काळात अशा आयोजनांना व्यापक स्वरूप प्राप्त होईल असा विश्वास शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केला.

**मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत महत्वाचे सामंजस्य करार**


वनविभागाच्या पुढील वाटचालीसाठी व व्याघ्र संवर्धनाच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमात महत्वाचे सामंजस्य करार करण्यात आले. या आयआरसीटीसी आणि वनविभागा दरम्यान शाश्वत वन्यजीव पर्यटनाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. बायएफ आणि वनविभाग यांच्या एचडीएफसी बँकेच्या परिवर्तन सीएसआर उपक्रमाद्वारे नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यात समृद्धी प्रकल्प राबविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

आरोहा ग्रुप, महिंद्रा हॉलिडेज अँड रिसॉर्ट इंडिया लिमिटेड आणि महाराष्ट्र वनविभाग यांच्यात शाश्वत पर्यटनावर आधारित पंचतारांकित लक्झरी प्रकल्प विकसित करण्यासाठी सामंजस्य करार असे एकूण 11 सामंजस्य करार करण्यात आले.

'समुदाय आधारित जीवनोपयोगी उपक्रम आणि हरित अर्थव्यवस्था','व्याघ्र संवर्धनासाठी सीएसआर गुंतवणूक','महाराष्ट्र-भारताचे प्रमुख वाघ (टायगर) पर्यटन गंतव्यस्थान' आणि 'मनुष्य-वाघ सहअस्तित्व आणि परिसंस्थेचे संवर्धन' विषयांवर विषयतज्ज्ञांचे सादरीकरण झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्याघ्र संवर्धनात उल्लेखनीय कार्यासाठी एशियाटिक बिग कॅट सोसायटीचे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. तत्पूर्वी, प्रधान वनसंरक्षक एम एस रेड्डी यांनी प्रास्ताविक केले. मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांनी नागपूर ग्रोथच्या माध्यमातून व्याघ्र संवर्धनासाठी करण्यात आलेल्या विविध उपाय योजनांबाबत माहिती दिली. नागपूर विभागाचे वनसंरक्षक जी. गुरूप्रसाद यांनी आभार मानले.

# बेलवाडीत सागर भिसे यांची १ लाख ६ हजारांची वर्गणी : इंदापूर तालुक्यात रंगली राजकीय चर्चा

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील बेलवाडी गावातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त युवा उद्योजक मा.सागर बाळासाहेब भिसे यांनी तब्बल १ लाख ६ हजारांची वर्गणी देत सामाजिक बांधिलकीचा वेगळाच आदर्श निर्माण केला आहे इंदापूर तालुक्यातील जयंती उत्सवासाठी दिल्या जाणाऱ्या वर्गण्यांमध्ये ही रक्कम सर्वाधिक असल्याची चर्चा सुरू असून,या योगदानामुळे मा. सागर भिसे यांचे नाव पुन्हा संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरले आहे.सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या मा.सागर भिसे यांनी स्वतःच्या कष्ट,जिद्द आणि उद्योगाच्या बळावर यश संपादन केले आहे. सामाजिक,शैक्षणिक आणि विविध सार्वजनिक उपक्रमांमध्ये ते सातत्याने




पुढाकार घेत असल्याने त्यांची ओळख केवळ उद्योजक म्हणून नव्हे,तर समाजाभिमुख युवा नेतृत्व म्हणूनही निर्माण झाली आहे.बेलवाडीतील अण्णा भाऊ साठे जयंती उत्सवासाठी त्यांनी दिलेल्या १ लाख ६ हजारांच्या वर्गणीची चर्चा आता गावापुरती मर्यादित राहिली नसून संपूर्ण इंदापूर तालुक्यात पोहोचली आहे. विविध राजकीय व सामाजिक वर्तुळांत या निर्णयाची चर्चा रंगली असून,नव्या पिढीतील उद्योजकही सामाजिक जबाबदारी स्वीकारत असल्याचे उदाहरण म्हणून या योगदानाकडे पाहिले जात आहे.

दरम्यान काही राजकीय वर्तुळांत या मोठ्या वर्गणीमुळे पारंपरिक राजकीय नेतृत्वावरही चर्चा सुरू झाली आहे.नव्या पिढीतील युवा उद्योजक सामाजिक कार्यात मोठ्या प्रमाणात पुढे येत असल्याने तालुक्यातील राजकीय समीकरणांवर त्याचा परिणाम होऊ शकतो,अशा प्रतिक्रिया काही स्तरांतून व्यक्त होत आहेत

आण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहितासाठी योगदान देण्याची परंपरा अधिक बळकट व्हावी,अशी भावना यानिमित्ताने सागर

भिसे व्यक्त केली असून,सागर भिसे यांच्या या योगदानाचे विविध स्तरांतून स्वागत व कौतुक केले जात आहे.

# संत रविदास बहुउद्देशीय मंडळ, लाखनी येथे गुरुपौर्णिमा उत्सव व सत्कार समारंभ उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** : संत रविदास बहुउद्देशीय मंडळ, लाखनी यांच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सव व सत्कार समारंभ बुधवारी (दि. २९ जुलै) सायंकाळी ७ वाजता भरपावसात आणि विजांच्या कडकडाटातही मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात गुरू संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या पुतळ्यास मा. राजेशजी (बबलुजी) निंबेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यानंतर गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित सत्कार समारंभ पार पडला.

यावर्षी संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या पुतळ्याच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पुतळा उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचा समाजाच्या



वतीने सत्कार करण्यात आला. मा. श्री. राजेशजी (बबलुजी) निंबेकर यांचा सत्कार श्री. टेकचंदजी खवसकर यांच्या हस्ते, समाजसेवक श्री. नरेशजी काटवले यांचा सत्कार सौ. कलाबाई गडकरी यांच्या हस्ते, तर ज्येष्ठ समाजसेवक श्री. एकनाथजी लांडगे यांचा सत्कार श्री. चिंटू मुंगले यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना मा. श्री. राजेशजी (बबलुजी) निंबेकर यांनी सांगितले की, सन २०००-०१ मध्ये विठोबाजी बसेशंकर, एकनाथजी लांडगे, नरेशजी काटवले तसेच समाजातील अनेक सहकाऱ्यांच्या अथक परिश्रमातून आणि प्रतिकूल परिस्थितीत संत रविदास महाराजांचा पुतळा उभारण्यात आला. समाजाच्या एकजुटीमुळे हे कार्य यशस्वी झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दैनिक युवक आधारचे पत्रकार श्री. रोशन खोब्रागडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. टेकचंद खवसकर यांनी केले. आभार प्रदर्शनात त्यांनी प्रकृती ठीक नसतानाही समाजाला दिलेला शब्द पाळत मा. श्री. राजेशजी (बबलुजी) निंबेकर यांनी मुसळधार पावसात कार्यक्रमाला उपस्थित राहून समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी जपल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व उपस्थितांचेही त्यांनी आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमाला विकास गडकरी, तुळशीदास काटवले, दैनिक युवक आधारचे पत्रकार स्वप्निल काटवले, योगेश राजगिरे, शुभम खवसकर, यशपाल बसेशंकर, रोहित खवसकर, ओम बावणे, कल्पेश शिंगनजुडे, जितेंद्र बन्सोड, शेखर खवसकर, गौरव बन्सोड, शुभम भिवगडे तसेच कलाबाई गडकरी, दिपाबाई बसेशंकर, कौशल्याबाई काटवले, दामिनीबाई बसेशंकर, सुषमाबाई खवसकर यांच्यासह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# येवलवाडी(ना.)सज्जासाठी तातडीने तलाठी नियुक्त करा, शेतकऱ्यांची गैरसोय थांबवा.:– सरपंच किशोर नागरगोजे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाटोदा मंडळातून नफरवाडी, बेलेवाडी आणि येवलवाडी हे स्वतंत्र महसुली सज्जे करण्यात येऊन येवलवाडी हे मुख्यालय निश्चित करण्यात आले आहे. मात्र, एक वर्षाचा कालावधी उलटूनही या सज्जासाठी तलाठी नियुक्त करण्यात आलेला नसल्याने



शेतकऱ्यांना पीक विमा, ७/१२ उतारे, फेरफार तसेच विविध महसुली कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. येवलवाडी सज्जासाठी तातडीने तलाठी नियुक्त करून शेतकऱ्यांची गैरसोय दूर करावी अशी मागणी येवलवाडीचे सरपंच किशोर नागरगोजे यांनी केली आहे. सरपंच नागरगोजे यांनी सांगितले की, शासनाने स्वतंत्र सज्जा मंजूर करून येवलवाडी येथे मुख्यालय निश्चित केले असले तरी अद्याप तलाठीची नियुक्ती झालेली नाही. त्यामुळे विशेषतः सध्या सुरू असलेल्या पीक विमा प्रक्रियेदरम्यान शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्रांसाठी वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. या संदर्भात त्यांनी आष्टी/पाटोदा/शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या कडे तसेच महसूल प्रशासनाकडे निवेदनाद्वारे तातडीने तलाठी नियुक्त करण्याची मागणी केली आहे.येवलवाडी सज्जातील शेतकऱ्यांची गैरसोय लक्षात घेऊन लवकरात लवकर नियमित तलाठीची नियुक्ती करावी, अशी अपेक्षा सरपंच किशोर नागरगोजे यांच्या सह ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# २०० क्षयरुग्णांना फूड बास्केटचे वाटप; आमदार विनोद अग्रवालांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्य शासनाच्या निर्देशानुसार २२ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत राज्यभर विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. त्याअंतर्गत गोंदिया तालुक्यात प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानांतर्गत २०० क्षयरुग्णांना फूड बास्केटचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी पुढाकार घेतला. जिल्हा परिषद गोंदियाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या माध्यमातून लाभार्थी क्षयरुग्णांची निवड करून त्यांना फूड बास्केटचे वितरण करण्यात आले.

राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या विशेष अभियानात विविध आरोग्य तपासण्या, ग्रामपंचायत स्तरावरील जनजागृती तसेच प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानांतर्गत 'निक्षय मित्र' उपक्रमावर विशेष भर देण्यात आला.

# हातात पुस्तकं हवीत,निवेदन नव्हे! बस थांबत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील कंकराळ्याच्या चिमुकल्यांना शिक्षणासाठी एसटीची प्रतीक्षा बस थांबत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान;भर पावसात निवेदन घेऊन रस्त्यावर उतरण्याची वेळ"ज्या वयात आमच्या हातात लेखणी आणि पुस्तके असायला हवीत,त्या वयात आम्हाला बससाठी अर्ज-निवेदने घेऊन रस्त्यावर का उतरावे लागत आहे?"असा काळजाला भिडणारा सवाल कंकराळा येथील चिमुकल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उपस्थित केला आहे. कंकराळा येथून सोयगाव येथील जिल्हा परिषद प्रशाळेत शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची एसटी बसअभावी मोठी गैरसोय होत असून,त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.सध्या ऐन पावसाळ्याचे दिवस सुरू आहेत.धुवाधार पाऊस, चिखल आणि निसरडे रस्ते अशा प्रतिकूल परिस्थितीत कंकराळा येथील विद्यार्थी दररोज शाळेत जाण्यासाठी धडपड करीत आहेत.मात्र, गावातील बसथांब्यावर एसटी बस वेळेवर न थांबल्याने विद्यार्थ्यांना बराच वेळ बसची प्रतीक्षा करावी लागते.अनेकदा बस आली तरी थांबत नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचण्यास उशीर होतो. परिणामी




त्यांचे तास बुडतात,शाळेतील परिपाठ चुकतो आणि नियमित उपस्थितीवरही परिणाम होत असल्याची विद्यार्थ्यांची तक्रार आहे.बस रिकामी असतानाही थांबत नाही, अशी विद्यार्थ्यांची व्यथा आहे. त्यामुळे शिक्षण घेण्यासाठी घरातून निघालेली ही चिमुकली मुले-मुली भर पावसात रस्त्यावर बसची वाट पाहताना दिसतात.शेवटी बस मिळाली नाही तर शाळा गाठण्यासाठी त्यांना इतर पर्यायांचा आधार घ्यावा लागतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. विशेष म्हणजे,हातात पुस्तकं घेऊन शाळेच्या दिशेने जाण्याच्या वयात या विद्यार्थ्यांना एसटी बस थांबविण्यासाठी अर्ज आणि निवेदने घेऊन प्रशासनाचे दरवाजे ठोठावण्याची वेळ आली आहे.

विद्यार्थ्यांच्या या प्रश्नाकडे गावातील लोकप्रतिनिधी,सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.आगार व्यवस्थापकांचे आश्वासन दरम्यान,याबाबत सोयगाव आगार व्यवस्थापकांशी संपर्क साधला असता,संबंधित चालक व वाहकांना ताकीद देण्यात येईल.तसेच मार्गावरील प्रत्येक अधिकृत थांब्यावर बस थांबविण्याच्या सूचना संबंधित चालकांना देण्यात येतील,असे त्यांनी सांगितले.आता आगार व्यवस्थापकांच्या आश्वासनानंतर कंकराळा येथील विद्यार्थ्यांची गैरसोय प्रत्यक्षात दूर होते का, याकडे विद्यार्थी,पालक आणि ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.कारण या चिमुकल्यांच्या हातात अर्ज नव्हे,तर पुस्तके दिसायला हवीत;त्यांच्या डोळ्यांत बसची चिंता नव्हे,तर उज्ज्वल भविष्याची स्वप्ने असायला हवीत!

# देवमोगरा गॅस एजन्सीकडून घरपोच गॅस सिलिंडर सेवा बंद; मिरागावमधील ग्राहकांची गैरसोय

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - बाळकृष्ण परब मिरा भाईंदर** : मिरा रोड परिसरातील भारत पेट्रोलियमच्या देवमोगरा गॅस एजन्सीकडून घरगुती गॅस सिलिंडरची घरपोच सेवा मिरागावामध्ये बंद करण्यात आल्याची तक्रार ग्राहकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना गॅस सिलिंडर मिळविण्यासाठी एजन्सीच्या वितरण केंद्रावर स्वतः जावे लागत असल्याने ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे.

घरगुती गॅस सिलिंडरची घरपोच सेवा ही ग्राहकांसाठी अत्यंत महत्त्वाची सुविधा आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच आजारी आणि वयोवृद्ध ग्राहकांना घरपोच सिलिंडर मिळणे सोयीचे ठरते. मात्र, घरपोच सेवा बंद झाल्यामुळे अशा ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

गॅस सिलिंडर बुक केल्यानंतर तो ग्राहकांच्या घरापर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे ही नियमित वितरण व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे देवमोगरा गॅस एजन्सीने मिरागाव परिसरातील घरपोच गॅस सिलिंडर वितरण सेवा तातडीने पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे.

दरम्यान, घरपोच सेवा नेमक्या कोणत्या कारणामुळे बंद करण्यात आली आहे, ती तात्पुरती बंद आहे की कायमस्वरूपी, तसेच सेवा पुन्हा कधी सुरू होणार याबाबत संबंधित गॅस एजन्सीने ग्राहकांना स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

मिरागाव परिसरातील ग्राहकांनी संबंधित गॅस एजन्सी तसेच भारत पेट्रोलियमच्या संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, घरपोच गॅस सिलिंडर वितरण सेवा पूर्ववत सुरू करावी आणि ग्राहकांना होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणी केली जात आहे.

# बोटोणीच्या एकलव्य शाळेत विद्यार्थ्यांचे हाल!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : भविष्याची स्वप्ने उराशी बाळगून शिक्षणासाठी वसतिगृहात राहणाऱ्या निष्पाप आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट खेळ मांडला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बोटोणी येथील एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलचे बांधकाम सुरू असल्याने ही शाळा किनवट तालुक्यातील सहस्त्रकुंड येथे स्थलांतरित करण्यात आली खरी, पण तिथे विद्यार्थ्यां नशिबी भयानक हाल अपेष्टा आल्या आहेत. पिण्यासाठी दूषित पाणी, रोज मिळणारे बेचव अन् निकृष्ट दर्जाचे जेवण आणि प्रचंड अस्वच्छतेमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य संकटात सापडले असून, या संपूर्ण कारभाराची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करा, असा थेट इशारा पालकांनी पांढरकवडा येथील आदिवासी विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



सहस्त्रकुंड येथील वसतिगृहात सोयी-सुविधांऐवजी समस्यांचेच साम्राज्य पसरले असल्याचे वास्तव पालकांनी मांडले आहे. पावसाळ्याच्या दिवसांत विद्यार्थ्यांना अशुद्ध आणि दूषित पाणी प्यावे लागत असल्याने संसर्गजन्य आजार पसरण्याची तीव्र भीती निर्माण झाली आहे. शासकीय नियमांनुसार मिळणाऱ्या पोषण आहाराला पूर्णपणे हरताळ फाळला जात असून, अत्यंत हलक्या दर्जाचे तेल, तिखट आणि मीठ वापरून तयार केलेले बेचव जेवण मुलांच्या घशात कोंबले जात आहे.

पाण्याच्या भीषण तुटवड्यामुळे वसतिगृहातील शौचालयांची दुरवस्था झाली असून संपूर्ण परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. आठवड्यातून एकदाही स्वच्छता केली जात नाही आणि जर सफाई केलीच तर तो कचरा उचलण्याऐवजी तिथेच साचवून ठेवला जातो. तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना तर भर पावसाळ्यात पाण्याने भरलेल्या बादल्या वर वाहून न्याव्या लागत आहेत. घाटंजी तालुक्यातील आपल्या पाल्यांचे हे हाल पाहून संतप्त झालेल्या पालकांनी अखेर प्रशासनाचे दार ठोठावत या भ्रष्ट कारभाराविरुद्ध एल्गार पुकारला आहे.

अखिल भारतीय आदिवासी युवा

## दुर्गंधी, पाणीटंचाई अन् बेचव अन्नाविरोधात पालकांची पांढरकवडा प्रकल्प अधिकाऱ्यांकडे धडक

विकास परिषदेचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष आकाश आत्राम यांच्या नेतृत्वात पालकांच्या शिष्टमंडळाने पांढरकवडा प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तात्काळ चौकशीची मागणी केली. या आंदोलनात भाऊराव मरापे, पी. एल. कुमरे, अनिल किनाके, वसंतराव कोवे, गणेश आत्राम, निकेश आत्राम, उमेश कुडमथे, मिथुन सोयाम, निलेश पंधरे, प्रशांत सुरपाम, श्रावण कुमरे, सुदर्शन आत्राम यांच्यासह शेकडो पालक आक्रमक भूमिकेत उपस्थित होते. जर प्रशासनाने वेळेत पावले उचलून ही दुरवस्था सुधारली नाही, तर तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा स्पष्ट इशाराही यावेळी देण्यात आला.

# पालोदवाडी जि.प. शाळेत 'एक पेड माँ के नाम' उपक्रम; विद्यार्थ्यांकडून रोपांच्या संगोपनाची शपथ

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : पर्यावरण संतुलनाचा संदेश देत व मातृमोहाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तालुक्यातील जि. प. प्राथमिक शाळा पालोदवाडी येथे 'वृक्षवल्ली टीम सिल्लोड'च्या सहकार्याने 'एक पेड माँ के नाम' हा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शालेय वयातच पर्यावरण संरक्षणाची मूल्ये रुजविण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात मातृवंदना व पर्यावरण संवर्धनाच्या संकल्पनेने झाली. या उपक्रमांतर्गत शाळेतील



प्रत्येक विद्यार्थ्यास एक याप्रमाणे विविध छायादार व फलदायी रोपांचे वितरण करण्यात आले. विशेष म्हणजे, मिळालेली रोपे केवळ तात्पुरती न लावता, शाळेच्या प्रांगणात तसेच आपापल्या शेतशिवावर व बांधावर लागवड करून त्यांचे जोपासना, संगोपन आणि निगा राखण्याची संपूर्ण जबाबदारी प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतः स्वीकारली. विद्यार्थ्यांचा हा निसर्गप्रेम आणि उत्तरदायित्वाचा भाव उपस्थितांची दाद मिळवून गेला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संजय बागूल, शिक्षक दत्तात्रय चव्हाण यांच्यासह गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ, पालक आणि 'वृक्षवल्ली टीम'चे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे पालोदवाडी परिसरात पर्यावरणपूरक वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मुरुडमध्ये अवैध धंद्यांविरोधात आधुनिक लहुजी सेनेचे आंदोलनात्मक पाऊल; पोलिसांकडे निवेदन देत कठोर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड परिसरात कथितरित्या सुरू असलेल्या अवैध धंद्यांमुळे सामाजिक वातावरण बिघडत असून, यावर तातडीने आळा घालावा, अशी मागणी आधुनिक लहुजी सेनेच्या वतीने मुरुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.आधुनिक लहुजी सेनेचे तालुका अध्यक्ष दत्ता (भाऊ) कांबळे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात मुरुड परिसरात मटका, अवैध दारू




विक्री, जुगार यांसारखे कथित अवैध धंदे मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारांमुळे परिसरातील सामाजिक वातावरण दूषित होत असून तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की, संबंधित ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने महिला, शाळकरी विद्यार्थी तसेच नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याबरोबरच गुन्हेगारी वाढण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अवैध धंद्यांवर तात्काळ कारवाई करावी, दोषींवर कठोर कायदेशीर पावले उचलावीत आणि हे अवैध व्यवसाय कायमस्वरूपी बंद करावेत, अशी मागणी आधुनिक लहुजी सेनेने केली आहे.दरम्यान, या निवेदनाची मुरुड पोलीस ठाण्यात प्राप्ती घेण्यात आली असून, पुढील कारवाईकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. निवेदनावर तालुका अध्यक्ष दत्ता (भाऊ) कांबळे यांच्यासह संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भाजप युवा मोर्चा जिल्हा चिटणीस पदी सचिन तायडे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : भारतीय जनता युवा मोर्चाच्या जिल्हा चिटणीसपदी सचिन लक्ष्मणराव तायडे (रा. आळंद, ता. फुलंब्री) यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक, संघटनात्मक व पक्षनिष्ठ कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषी एकनाथ नरवडे यांनी ही नियुक्ती केली आहे.



या निवडीबद्दल राजकीय व सामाजिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी काळात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी ते प्रभावी योगदान देतील, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. युवकांना संघटित करून भारतीय जनता पक्षाची विचारधारा अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याचे मनोगत नवनिर्वाचित जिल्हा चिटणीस सचिन तायडे यांनी व्यक्त केले आहे.सचिन तायडे यांच्या निवडीबद्दल माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, मंत्री अतुल सावे, आमदार अनुराधाताई चव्हाण व आमदार सुहास शिरसाट यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# मुरूडला नगर परिषद दर्जा देण्याची मागणी; मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे संघर्ष कृती समितीचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : लातूर जिल्ह्यातील मुरूड ग्रामपंचायतीला नगर परिषद दर्जा देण्याच्या प्रस्तावाला जनगणनेच्या अधिसूचनेच्या अधीन राहून तत्त्वतः मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी मुरूड नगर परिषद संघर्ष कृती समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.समितीने दिलेल्या माहितीनुसार, मुरूड नगर परिषदेचा सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी लातूर यांनी २३ जून २०२६ रोजी नगर विकास विभागाकडे सादर केला आहे. या प्रस्तावासाठी आवश्यक असलेले सर्व कायदेशीर, प्रशासकीय, लोकसंख्याविषयक, महसुली व भौगोलिक निकष पूर्ण करण्यात आले असून, प्रस्ताव अंतिम निर्णयाच्या प्रतीक्षेत आहे.दरम्यान, जनगणनेच्या अधिसूचनेमुळे ३० डिसेंबर



२०२७ पर्यंत नवीन नगर परिषद स्थापन करण्याची अंतिम अधिसूचना जारी करता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, मुरूडची वाढती लोकसंख्या, वेगाने होत असलेला नागरी विस्तार आणि पायाभूत सुविधांवरील वाढता ताण लक्षात घेता हा प्रस्ताव इतका काळ प्रलंबित ठेवणे योग्य ठरणार नाही, असे समितीचे म्हणणे आहे. त्यामुळे नगर विकास विभागाने प्रस्तावाची सर्व प्रशासकीय व कायदेशीर छाननी तातडीने पूर्ण करून त्यास तत्त्वतः किंवा सशर्त मंजुरी द्यावी. जनगणनेवरील निर्बंध संपताच तात्काळ अंतिम अधिसूचना काढून मुरूडला नगर परिषद दर्जा जाहीर करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.मुरूडच्या सर्वांगीण विकासाला गती मिळावी, नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि शहराच्या नियोजित विकासाचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आवाहन संघर्ष कृती समितीने केले आहे.

यावेळी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष जयदीप राजाराम सुरवसे, बळीराम इंगळे आणि शाईन सय्यद यांनी शासनाने मुरूडकरांच्या भावनांचा आदर करून नगर परिषद स्थापनेचा मार्ग तातडीने मोकळा करावा, अशी मागणी केली.

# ७० वर्षांचा अनुशेष संपणार? मूर्तीजापूर–अचलपूर शकुंतला रेल्वे आता थेट आदिलाबादपर्यंत जोडण्याची जोरदार मागणी!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी – महेश पेन्दोर** : विदर्भाच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या ऐतिहासिक शकुंतला रेल्वेच्या विस्ताराची मागणी आता अधिक वेगाने पुढे येत आहे. गेल्या सुमारे ७० वर्षांपासून प्रलंबित असलेला अनुशेष भरून काढण्यासाठी मूर्तीजापूर–अचलपूर रेल्वेमार्गाचा विस्तार यवतमाळ, घाटंजी, पारवा, उनकेश्वर, मांडवी मार्गे तेलंगणातील आदिलाबादपर्यंत करण्यात यावा, अशी जोरदार मागणी टिपेश्वर रेल्वे जनआंदोलन समितीने केली आहे.या मागणीसंदर्भात समितीच्या शिष्टमंडळाने माजी खासदार विजयजी दर्डा तसेच किशोरजी दर्डा यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या रेल्वेमार्गाचे आर्थिक, सामाजिक आणि पर्यटनदृष्ट्या होणारे महत्त्व समितीने त्यांच्या निदर्शनास आणून दिले.समितीने सांगितले की, या रेल्वेमार्गामुळे मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि तेलंगणा ही देशातील प्रमुख कापूस उत्पादक राज्ये थेट रेल्वेने जोडली जातील. परिणामी कापूस, कृषीमाल व इतर उत्पादनांची वाहतूक कमी खर्चात, जलद आणि थेट मोठ्या बाजारपेठांपर्यंत होईल. यामुळे शेतकरी, व्यापारी, उद्योजक आणि स्थानिक उद्योगांना मोठा फायदा होणार आहे.याशिवाय टिपेश्वर अभयारण्य , निम्न पैनगंगा प्रकल्प तसेच परिसरातील धार्मिक व पर्यटनस्थळांच्या



विकासालाही मोठी चालना मिळेल. सीमावर्ती भागातील नागरिकांना दळणवळणाची प्रभावी सुविधा उपलब्ध होईल. शिक्षण, उद्योग, पर्यटन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊन विदर्भाच्या विकासाला नवी गती मिळेल.

बैठकीदरम्यान विजयजी दर्डा यांनी या मागणीचे स्वागत करत समितीच्या सनदशीर आंदोलनाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी

## टिपेश्वर रेल्वे जनआंदोलन समितीने घेतली माजी खासदार विजयजी दर्डा यांची भेट; रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन

वैष्णव यांची लवकरच भेट घेऊन शकुंतला एक्सप्रेस यवतमाळपर्यंत कशा पद्धतीने आणता येईल आणि पुढे घाटंजी मार्गे आदिलाबादशी जोडण्याबाबत सखोल अभ्यास करून व्यवहार्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. या विषयावर सकारात्मक पाठपुरावा करून तो योग्य स्तरावर मांडला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.या वेळी किशोरजी दर्डा यांनीही या जनहिताच्या उपक्रमाला सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली.या भेटीप्रसंगी टिपेश्वर रेल्वे जनआंदोलन समितीचे पदाधिकारी महेश पेन्दोर, कैलास कोरवते, अरविंद चौधरी, कंजूम कुरेशी आणि दिनेश गाऊत्रे उपस्थित होते.या भेटीनंतर तीन राज्यांना जोडणाऱ्या या महत्त्वाकांक्षी रेल्वे मार्गाच्या मागणीला नवे बळ मिळाले असून, विदर्भाच्या विकासाचा एक नवा अध्याय सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# थेपडे शिक्षण संकुलात गुरुपौर्णिमा भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी

**दैनिक युवक आधार**

**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील** : दि. २९ जुलै २०२६ रोजी बनाबाई गगडाणी विश्वस्त निधी, अडावद संचलित थेपडे शिक्षण संकुल, म्हसावद येथे गुरुपौर्णिमेचा पवित्र उत्सव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, थेपडे ज्युनिअर कॉलेज आणि थेपडे एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालय अशा तिन्ही विभागांमध्ये भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.भारतीय संस्कृतीमध्ये गुरुपौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आषाढ पौर्णिमेच्या दिवशी महर्षी वेदव्यास यांच्या जयंतीनिमित्त हा पवित्र दिवस 'व्यास पौर्णिमा' म्हणूनही साजरा केला जातो. ज्ञान, संस्कार, सदाचार आणि जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस मानला जातो. गुरु हे अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारे मार्गदर्शक असल्याने विद्यार्थी या दिवशी आपल्या शिक्षकांना, गुरुजनांना व मार्गदर्शकांना वंदन करून त्यांच्याप्रती आदर, श्रद्धा आणि कृतज्ञता व्यक्त करतात. याच पवित्र भावनेतून थेपडे शिक्षण संकुलातील तिन्ही विभागांमध्ये गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

**माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय**

स्वा. सै. पं. ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री. जी. डी. बच्छाव सर होते. प्रमुख पाहुण्या म्हणून बी.के. दिपाली दीदी व मालती राजपूत दीदी उपस्थित होत्या. तसेच केंद्रप्रमुख आदरणीय श्री. प्रदीप राजपूत दादा यांनी गुरुचे जीवनातील महत्त्व, संस्कार, शिस्त व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासंदर्भात प्रेरणादायी मार्गदर्शन केले. बी.के. दिपाली दीदी यांनी आध्यात्मिक दृष्टिकोनातून गुरुचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.




यावेळी कु. काव्या दिनेश कलाल (इयत्ता ५ वी अ), कु. सोनाक्षी विकास पाटील (इयत्ता ५ वी अ), कु. गीतांजली अनिल मोरे (इयत्ता ५ वी अ), कु. सोमेश्वरी शंकर चित्ते (इयत्ता ६ वी क), कु. हेमांगी चंद्रशेखर शिवदे (इयत्ता ६ वी क) तसेच कु. श्रद्धा प्रमोद चव्हाण (इयत्ता ८ वी अ) यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगणारी मनोगते व्यक्त केली.

मंचावर उपप्राचार्य श्री. के. पी. पाटील सर, पर्यवेक्षक श्री. एस. जे. पवार सर, ज्येष्ठ शिक्षक श्री. एस. एम. नेतकर सर तसेच सौ. अनिता नेवे मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्री. पी. पी. मगरे सर यांनी केले.

**थेपडे ज्युनिअर कॉलेज**

थेपडे ज्युनिअर कॉलेजमध्येही गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री. जी. डी. बच्छाव सर होते. सौ. पी. पी. चव्हाण मॅडम यांनी गुरुचे महत्त्व अधोरेखित करणारे प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. खुशी गायकवाड व कु. विधी पटेल यांनी केले. यावेळी विभागप्रमुख श्री. वाय. पी. चिंचोरे सर यांच्यासह सर्व शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

**थेपडे एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालय**

स्वा. सै. पं. ध. थेपडे एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयातही गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

# महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल | प्रतिनिधी** : पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र शासनाने कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेसाठी सुरू केलेल्या SHE-Box (Sexual Harassment Electronic Box) या ऑनलाइन तक्रार निवारण पोर्टलची पनवेल महानगरपालिकेत प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी महापालिकेत पत्राद्वारे महत्त्वपूर्ण मागणी केली आहे. या पत्रामध्ये महापालिकेच्या सर्व विभागांमध्ये सोबतच पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या सर्व विविध कार्यालयांमध्ये SHE-Box पोर्टलची प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक छळ रोखण्यासाठी केंद्र शासनाने विकसित केलेले SHE-Box पोर्टल हे महिलांसाठी सुरक्षित, विश्वासार्ह आणि ऑनलाइन तक्रार नोंदविण्याचे प्रभावी व्यासपीठ आहे. या पोर्टलची माहिती प्रत्येक महिला अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका तसेच महापालिकेच्या विविध विभागांशी संबंधित महिलांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे.



यासाठी महापालिकेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व कार्यालयांमध्ये SHE-Box पोर्टलबाबत विशेष जनजागृती अभियान, प्रशिक्षण कार्यशाळा, मार्गदर्शन सत्रे, QR Code, माहिती फलक, पोस्टर्स उपलब्ध करून महिलांना ऑनलाइन तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुलभ करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांच्या माध्यमातूनही या पोर्टलची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा आग्रह धरण्यात आला आहे.

- पनवेल महापालिकेत SHE-Box पोर्टलची प्रभावी अंमलबजावणी
- महिला सुरक्षिततेला मिळणार नवे बळ
- 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाच्या महिला सुरक्षितता उपक्रमाला पनवेल महापालिकेत गती
- प्रभावी अंमलबजावणी व जनजागृती करण्याबाबत घेतला पुढाकार'

'पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणाला सर्वोच्च प्राधान्य देणारे अनेक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले आहेत. **SHE-Box** हे त्याच दूरदृष्टीचे प्रभावी उदाहरण आहे. महिलांना सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यस्थळ मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे यांनी पनवेल महानगरपालिकेत या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घेतलेला पुढाकार निश्चितच स्वागतार्ह आहे. या माध्यमातून महिला अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांमध्ये जागरूकता वाढेल, तक्रार निवारण व्यवस्था अधिक सक्षम होईल आणि महिला सुरक्षिततेला नवे बळ मिळेल.'

श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे
भा.ज.प. नेते

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ. ममता प्रितम म्हात्रे म्हणाल्या, "पंतप्रधान मा.नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि सन्मानासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले आहेत. SHE-Box हे त्यापैकी एक प्रभावी डिजिटल व्यासपीठ असून प्रत्येक महिलेला त्याची माहिती मिळणे आणि गरज पडल्यास निर्भयपणे त्याचा वापर करता येणे आवश्यक आहे. पनवेल महानगरपालिकेत या पोर्टलची प्रभावी अंमलबजावणी आणि व्यापक जनजागृतीसाठी महिला व बालकल्याण समिती सातत्याने प्रयत्नशील राहील."

महिलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत केंद्र शासनाच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाची पनवेल महानगरपालिकेत प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बालकल्याण समितीने उचललेले हे पाऊल महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# पिंपळयात शेतकऱ्यांसाठी भरली शेतीशाळा; मंडळ कृषी अधिकारी अमोल तांबे यांनी दिला नैसर्गिक पीक संरक्षणाचा प्रभावी मंत्र!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : पिंपळा (मालेगाव) खरीप हंगामात तूर पिकाचे संरक्षण, उत्पादनात वाढ आणि रासायनिक कीटकनाशकांवरील खर्च कमी करण्याच्या उद्देशाने आत्मा अंतर्गत पिंपळा येथे तूर पिकाची शेतीशाळा उत्साहात पार पडली. या शेतीशाळेत मंडळ कृषी अधिकारी अमोल तांबे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत नैसर्गिक व एकात्मिक पीक संरक्षणाच्या विविध उपाययोजनांचे सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी मंडळ कृषी अधिकारी अमोल तांबे यांनी फेरोमोन (कामगंध) ट्रॅपचे महत्त्व, त्याचा वापर कसा करावा, किती दिवसांनी त्याची पाहणी करावी आणि त्याद्वारे पिकांवरील किडींचा प्रादुर्भाव कसा नियंत्रणात ठेवता येतो, याबाबत शेतकऱ्यांना सोप्या भाषेत माहिती दिली. त्यानंतर पिवळया चिकट सापळ्यांचे महत्त्व, मावा (ॲफिड) व इतर रसशोषक किडींचा प्रादुर्भाव नैसर्गिकरीत्या कमी करण्यासाठी त्यांचा प्रभावी वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.तसेच पक्षी थांबे उभारण्याचे महत्त्व सांगून पक्ष्यांमार्फत पिकांवरील हानिकारक अळया व किडींचे नैसर्गिक नियंत्रण कसे होते, याविषयीही शेतकऱ्यांना




माहिती देण्यात आली. कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्यासाठी नैसर्गिक व एकात्मिक पीक संरक्षणाचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी गणेश इढोळे यांनीही शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन, किड नियंत्रण आणि शाश्वत शेतीविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांना संतुलित पीक व्यवस्थापन, वेळेवर निरीक्षण आणि कृषी विभागाच्या शिफारशींचे पालन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास कृषी सखी कल्पना वानखडे, मायाताई धोंगडे, माजी पंचायत समिती सदस्य जगदेव ढंगारे,महादेव वानखडे, विष्णू महाराज चौधरी, श्याम धोंगडे,पंढरी धोंगडे,गजानन धोंगडे कृषी मित्र,दिलीप वानखडे,रोहन धोंगडे, दशरथ पांढरे,गोपाल देवळे, ज्ञानेश्वर पांढरे,बबन चौधरी, किसन धोंगडे, विष्णू चौधरी, विशाल पाठे यांच्यासह गावातील महिला-पुरुष शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गावातील अनेक महिला-पुरुष शेतकरी बांधवांनी शेतीशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित शेतकऱ्यांनी नैसर्गिक व एकात्मिक पीक संरक्षण, फेरोमोन ट्रॅप, चिकट सापळे आणि पक्षी थांब्यांच्या वापराबाबत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

'फेरोमोन ट्रॅप, चिकट सापळे आणि पक्षी थांब्यांचा योग्य वापर करा. नैसर्गिक व एकात्मिक पीक संरक्षणाचा अवलंब केल्यास खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होते.

श्री.अमोल तांबे मंडळ कृषी अधिकारी,मालेगाव

# श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये गुरुंचा सत्कार




**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड परिसरात नामांकित असलेल्या श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये आज गुरु पोर्णिमेचे औचित्य साधून विद्यार्थ्यांकडून गुरुंचा सत्कार करण्यात आला . यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून चारूशिला भोसले उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांच्या हस्ते सरस्वती देवीच्या प्रतीमेचे पूजन करण्यात आले त्याप्रसंगी शाळेचे उपमुख्याध्यापक उमेश कुंभार उपस्थीत होते . हा कार्यक्रम मुख्याध्यापिका विनू सेन यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला असून यावेळी प्रमुख पाहुण्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . तसेच वैशाली देशमुख , ज्योती वांगसकर , ज्योती ढेकणे या शिक्षीकेनीही मुलांना मार्गदर्शन केले . तर आरोही रत्नपारखे व ऐश्वर्या सेन या विद्यार्थीनींनी आपले मनोगत मांडले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शांती मार्डी यांनी केले . या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक / शिक्षीका यांचा सत्कार विद्यार्थ्यांकडून करण्यात आला . तसेच संस्थेचे अध्यक्ष दिपक झाडके, सचिव प्रा. दत्तात्रय जाधव व कोषाध्यक्ष प्रा. शंकर पाटील यांनी सर्व शिक्षकांना गुरु पोर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या .

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश बावळे , आदित्य सिंग ,उमेश मारकड , सौरभ चव्हाण, कमलेस सेन , रणजीत राऊत, शिवराम सौंदरे , सचिन मिश्रा तसेच गीता फेरे , अर्चना पाटील , श्रीदेवी माशाळकर , रेश्मा कुंभार , संगीता बिटले ,संध्या माळी , आकांक्षा लोमटे , अश्विनी नाडे , उषा नाईकनवरे , रुचिता इरपतगीरे, जयश्री जाधव, श्रद्धा शितोळे, बबीता सिंग, सना पठाण, प्रतिक्षा कलशेट्टी, श्रद्धा उपाडे , प्रियंका शिंदे , पूजा माने , रत्नप्रभा देशमुख , त्रिशाला कापसे , सोनाली सापसोड यांचे सहकार्य लाभले .

# एकोडी येथे स्मृतिशेष प्रबोधनकार मनोजभाऊ कोटांगले यांचा प्रथमस्मृती दिन व गुरुशिष्य स्नेहमीलन सोहळा कार्यक्रमाचे १ ऑगस्ट ला आयोजन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे विशेष प्रतिनिधी** : भंडारा- महाराष्ट्रात प्रबोधनाची चळवळ सांगणारा अभ्यासू व्यक्तिमत्व स्मृतिशेष प्रबोधनकार मनोजभाऊ कोटांगले यांचा प्रथम स्मृती दिवस व गुरुशिष्य स्नेहमीलन सोहळा या कार्यक्रमाचे भव्यदिव्य आयोजन १ आगस्ट २०२६ शनिवार ला सुमेध बुद्ध विहार एकोडी येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमा मध्ये सकाळी 9 वाजता प्रसिद्ध आलेबेदर येथे वृक्ष पूजन, त्यानंतर एकोडी येथील वृक्ष पूजन, भिक्खू संघ भोजनदान, परित्राण, संगीतमय कार्यक्रम, श्रद्धांजली कार्यक्रम, गुरुशिष्य सत्कार सोहळा अस कार्यक्रमाचे स्वरूप असणार आहे.

या मध्ये सत्कार मूर्ती म्हणून राष्ट्रीय प्रबोधनकार प्रकशनाथ पाटणकर, अनिरुद्ध शेवाळे,मनोजराजा गोसावी, जेष्ठ बेंजोवादक कनय्या मेश्राम उपस्थित राहनार आहेत.

या कार्यक्रमात उदघाटक समाजकल्याण सभापती शीतलताई राऊत,अध्यक्ष ॲड.रामटेके भंडारा, विशेष अतिथी तहसीलदार निलेश कदम,पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर, सामाजिक चळवळीचे




नेते परमानंद मेश्राम, पंचायत राज प्राचार्य अभय बन्सोड , सभापती डॉ.ललित हेमने, एकोडी सरपंच संजय खोब्रागडे, कवी सुभाष मानवटकर,जयंत देशपांडे सर्व ग्रामपंचायत कमिटी एकोडी यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

संगीतमय कार्यक्रमात महाराष्ट्र नावाजलेले गायक प्रबोधनकार, जेष्ठ वादक, कवी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन मोहिनी मनोज कोटांगले, एकनाथ कोटांगले, मंगेश कोटांगले, भावेश कोटांगले, संदिप कोटांगले, तेजस कोटांगले व समस्त कोटांगले परिवार यांनी केलेले आहे.

# लोककला व लोककलावंतांच्या राज्यव्यापी सर्वेक्षणाबाबत सकारात्मक चर्चा सांस्कृतिक मंत्र्यांचे अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन निर्णयाचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : राज्यातील सर्व लोककला प्रकार आणि लोककलावंतांची राज्यव्यापी जनगणना (सर्वेक्षण) करून त्यांना शासनमान्य अधिकृत ओळखपत्र देण्यात यावे, तसेच लोककला प्रकारांची प्रमाणित माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावी, या प्रमुख मागण्यांवर सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्यासोबत बुधवारी सकारात्मक चर्चा झाली. या विषयावर लवकरच सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल, असे आश्वासन श्री. शेलार यांनी दिले लोककलवंतांच्या विविध प्रश्नावर लोककला अकादमीचे विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे, ज्येष्ठ पत्रकार व लोककलेचे अभ्यासक खंडूराज गायकवाड आणि लोककलेचे अभ्यासक डॉ. शिवाजी वाघमारे यांनी सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या सोबत प्रदीर्घ चर्चा केली.

महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर ६६ वर्षे उलटून गेली असली तरी राज्यातील लोककला प्रकार आणि लोककलावंतांची अधिकृत शासकीय नोंद उपलब्ध नसल्याने सांस्कृतिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, आर्थिक नियोजन आणि लोककलावंतांसाठीच्या विविध कल्याणकारी योजनांचे अचूक नियोजन करण्यात अडचणी येत असल्याचा मुद्दा शिष्टमंडळाने मांडला.



दि. १६ एप्रिल २०१५ च्या शासन निर्णयानुसार लोककला, लोकनृत्य आणि लोकवाद्यांचे जतन, संकलन, दस्तऐवजीकरण व संगणकीकरणाची मोहीम हाती घेण्यात आली होती. मात्र, अपेक्षित उद्दिष्टे पूर्ण न झाल्याने हा उपक्रम नव्याने आणि अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

कोकणातील दशावतार लोककलेच्या सर्वेक्षणाचा निर्णय स्वागतार्ह असल्याचे सांगत, त्याच धर्तीवर राज्यातील सर्व लोककला प्रकार आणि लोककलावंतांचे जिल्हानिहाय सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या संकेतस्थळावर लोककला प्रकारांची प्रमाणित यादी प्रसिद्ध करून सर्व लोककलावंतांना शासनमान्य ओळखपत्र देण्याचाही आग्रह धरण्यात आला.

या सर्वेक्षणामुळे राज्यातील लोककला प्रकारांची अधिकृत माहिती उपलब्ध होईल, सांस्कृतिक धोरण अधिक प्रभावीपणे राबविता येईल, संशोधक व विद्यार्थ्यांना प्रमाणित माहिती मिळेल आणि लोककलावंतांना शासनाच्या विविध योजना, मानधन, अनुदान व कल्याणकारी सुविधांचा लाभ अधिक सुलभपणे मिळू शकेल, असे खंडूराज गायकवाड यांनी बैठकीत सांगितले.

यापूर्वी जिल्हानिहाय सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने लोककला महोत्सव आयोजित केले जात होते. मात्र, हे महोत्सव बंद झाल्याने स्थानिक लोककलावंतांना आपली कला सादर करण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे हे महोत्सव तातडीने पुन्हा सुरू करावेत, अशी मागणी प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे यांनी केली. याबाबतही सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे मंत्री आशिष शेलार यांनी स्पष्ट केले.

बैठकीत लोककलावंतांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा झाली. या सर्व विषयांवर लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आवश्यक उपाययोजनांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन श्री. शेलार यांनी शिष्टमंडळाला दिले.